मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६९ ■ शुक्रवार, १२ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514



**पिसार्वे गावातील गामी बिल्डरने सुरू असलेल्या बांधकामामुळे गावातून बाहेर जाणारा नैसर्गिक नाला बंद होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने पावसाळ्यात गावात पाणी साचण्याची व नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर रोहिंजन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांनी गामी बिल्डरला इशारा दिला आहे. "गावातील नैसर्गिक नाला तात्काळ पूर्ववत करून पाण्याचा मार्ग मोकळा करावा. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी त्वरित पावले उचलावीत, असेही नंदकुमार म्हात्रे यांनी स्पष्ट केले आहे.**

**( दैनिक युवक आधार )**

# वीजेच्या अंधारावर मनसेची तिरडी यात्रा; महावितरणच्या निष्काळजीपणाचा ‘अंत्यसंस्कार’!"

## पनवेलकरांचा संताप रस्त्यावर; मनसेचा महावितरणला इशारा – आता तरी जागे व्हा!

**पनवेल | प्रतिनिधी**

**दिपक कोळवणकर, :** पनवेल, कामोठे, खांदा कॉलनी, कळंबोली, उलवे आणि नवीन पनवेल परिसरात वारंवार होणाऱ्या वीज खंडितीच्या समस्येमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या भावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने गुरुवारी महावितरणविरोधात अनोखे आंदोलन छेडले. महावितरणच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध करत मनसे पदाधिकाऱ्यांनी तिरडी यात्रा काढून महावितरणच्या नावाने जोरदार घोषणाबाजी केली.

गेल्या अनेक महिन्यांपासून पनवेल परिसरात अचानक वीजपुरवठा खंडित होणे, तासन्तास वीज न येणे, तक्रारी करूनही अधिकाऱ्यांकडून



समाधानकारक उत्तर न मिळणे, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. विशेषतः उष्णतेच्या दिवसांत लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच घरातून ऑनलाइन काम करणारे कर्मचारी व व्यावसायिक यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर मनसेने महावितरणच्या कारभाराचा प्रतीकात्मक निषेध करत तिरडी यात्रा काढली. आंदोलनादरम्यान "महावितरण जागे व्हा", "वीज द्या, नाहीतर खुर्ची सोडा", अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या आंदोलनात महानगर सचिव श्री पराग बालड, महानगर उपाध्यक्ष श्री संदीप जाधव, खांदा कॉलनी विभाग अध्यक्ष श्री सिद्धेश जाधव, महानगर अध्यक्ष (महिला) सौ. स्वरूपा सुर्वे, विधानसभा संघटक सौ. पूजा मोहन, जिल्हा वाहतूक संघटक श्री सचिन जाधव तसेच रायगड जिल्हा सचिव श्री अतुल चव्हाण यांनी सक्रिय सहभाग घेतला.मनसे पदाधिकाऱ्यांनी इशारा दिला की, वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमागील कारणे नागरिकांसमोर जाहीर करावीत, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि पनवेल परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणखी तीव्र आंदोलन छेडेल. पनवेलसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरात नागरिकांना मूलभूत वीजसेवाही नियमित मिळत नसेल, तर विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केवळ कागदावरच राहतील, अशी टीकाही आंदोलनकर्त्यांनी केली."तिरडी ही फक्त प्रतीकात्मक होती;

पण नागरिकांच्या संयमाचा अंत्यसंस्कार होण्यापूर्वी महावितरणने जागे व्हावे," असा इशारा मनसेने यावेळी दिला.

# रयत’तर्फे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शनिवारी हृद्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या वतीने शनिवारी (दि. १३) सातारा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृद्य गौरव होणार आहे.

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी विधानसभा अध्यक्ष व संस्थेच्या





मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य आमदार दिलीप वळसे-पाटील उपस्थित राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे असणार आहेत. त्याचप्रमाणे संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी लिहिलेल्या ‘रामशेठ नाबाद ७५’ या ग्रंथाचे प्रकाशन यावेळी खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे, तर संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या ‘अमृतपर्व’ या स्मरणिकेचे प्रकाशनसुद्धा त्यांच्या हस्ते होईल. रयत शिक्षण संस्था व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचावे यासाठी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील अर्थात कर्मवीर अण्णांनी सुरू केलेला वसा पुढे नेण्याचे काम रयतसेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर अविरतपणे करीत आहेत. स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था असतानाही त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर असलेले जीवापाड प्रेम कायम अधोरेखित झाले. रयतला मातृसंस्था मानून सदैव रयतेच्या विकासासाठी कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजात आदर्श घालून दिला आहे. सातारा येथे होणाऱ्या सत्कार सोहळ्यास संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, शाखाप्रमुख सेवक उपस्थित राहणार आहेत. शिक्षणप्रेमींनी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले आहे.

# १९ वर्षाच्या अन्यायाविरोधात रहिवाशांचा म्हाडा कार्यालयावर मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** म्हाडा न्यू पीएमजीपी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, मुलुंड (पूर्व) येथील १,३९९ सभासदांचा पुनर्विकास प्रकल्प सन २००७ पासून सुरू असून, तब्बल १९ वर्षे उलटूनही हा प्रकल्प अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. आजही ६०६सदनिका व ४७ दुकाने म्हाडा प्रशासनाकडून बांधून पूर्ण करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या प्रकल्पातील रहिवासी व सभासद गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या हालअपेष्टा सहन करीत आहेत.

गेल्या वर्षभरापासून बाधित रहिवासी सभासदांनी म्हाडा मुख्यालय, बांद्रा येथे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) व उपाध्यक्ष (VP) यांची वारंवार भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना वेळ देण्यात येत नव्हती. यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करत जनकल्याण रहिवासी विकास समितीच्या वतीने दिनांक ९ जून २०२६ रोजी म्हाडा मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चामध्ये सुमारे २५० हून अधिक



बाधित रहिवासी सभासद सहभागी झाले होते. तसेच छत्रपती शासन पक्षाचे संस्थापक मा. नामदेवराव जाधव साहेब व समितीचे कायदेशीर सल्लागार यांनी या आंदोलनास मोलाचे सहकार्य केले.

मोठ्या संख्येने नागरिक म्हाडा कार्यालयात दाखल झाल्याचे समजताच, नागरिकांच्या भेटीचा दिवस असतानाही संबंधित वरिष्ठ अधिकारी कार्यालयातून निघून गेले. तसेच प्रवेशद्वारावर उपस्थित असलेल्या नागरिकांना इमारतीमध्ये प्रवेश करण्यासही मज्जाव करण्यात आला.

यानंतर मा. नामदेवराव जाधव साहेब यांच्या उपस्थितीत काही प्रतिनिधी सभासदांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व उपाध्यक्ष यांच्या कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून बाधित रहिवासी सभासदांची बैठक लवकरात लवकर आयोजित करण्यात येईल, असे जनकल्याण रहिवासी विकास समितीला आश्वासन देण्यात आले.

# मुरुडमध्ये अवैध धंद्यांचे साम्राज्य कायम; नव्या अधिकाऱ्यांच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी :** मुरुड शहरात अवैध दारू विक्री, मटका, जुगार यांसारखे बेकायदेशीर व्यवसाय अद्यापही बिनधास्तपणे सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. पोलीस ठाण्यात नुकतेच सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) अंधारे यांनी पदभार स्वीकारला असला, तरी शहरातील अवैध धंद्यांवर अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

नवीन अधिकाऱ्यांच्या आगमनानंतर शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत अपेक्षा वाढल्या होत्या. मात्र, विविध भागांमध्ये अवैध धंदे पूर्वीप्रमाणेच सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाची या प्रकारांकडे नेमकी काय भूमिका आहे, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

अवैध व्यवसायांमुळे युवकांवर विपरीत परिणाम होत असून सामाजिक वातावरणही बिघडत असल्याची भावना अनेक नागरिकांनी




व्यक्त केली आहे. शहरातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

नवीन एपीआय अंधारे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस प्रशासन शहरातील अवैध धंद्यांविरोधात कोणती पावले उचलते, याकडे आता मुरुडकरांचे लक्ष लागले आहे. नागरिकांना अपेक्षा आहे की, स्वागत-सत्काराच्या कार्यक्रमांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कारवाईतून कायद्याचा धाक निर्माण केला जाईल.

# एकीची ताकद ओळखा; पनवेलमधील ॲम्बुलन्स चालक-मालकांनी घडवला नवा इतिहास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** आजपर्यंत अनेक कारणांमुळे विखुरलेले, आपापसातील मतभेद आणि स्पर्धेमुळे एकमेकांपासून दूर गेलेले ॲम्बुलन्स चालक-मालक अखेर एका छताखाली एकत्र आले आहेत. पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे झालेल्या ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या सभेने एक नवा इतिहास घडवला असून, संघटित शक्तीची खरी ताकद काय असते याचे दर्शन घडवून दिले.

रुग्णसेवा हे केवळ काम नसून ती एक सामाजिक जबाबदारी आहे. दिवस-रात्र, उन्हाळा-पावसाची पर्वा न करता रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी धावणाऱ्या ॲम्बुलन्स चालक-मालकांच्या अनेक समस्या आजही कायम आहेत. मात्र या समस्या एकट्याने




लढून सुटणार नाहीत, तर संघटित होऊनच त्यावर मात करता येईल, ही भावना या सभेत प्रकर्षाने व्यक्त करण्यात आली.

यावेळी पनवेल शहर कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली. प्रमुख सल्लागार म्हणून सोमनाथ पवार, अध्यक्ष म्हणून नितीन कसाबे, उपाध्यक्ष म्हणून संतोष निम्बर्गी व इमरान खान, सचिव म्हणून प्रदीप छेडे, सहसचिव म्हणून राज निम्बर्गी, खजिनदार म्हणून प्रकाश जाधव व मुकुंद कांबळे, तर नाकाप्रमुख म्हणून इमरान वावळे व अरबाज यांची निवड करण्यात आली.

या सभेला उपस्थित असलेल्या अनेक चालक-मालकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "आजपर्यंत आपण वेगवेगळे होतो, त्यामुळे आपल्या प्रश्नांकडे कोणी गांभीर्याने पाहत नव्हते. पण आता आपण एक कुटुंब म्हणून उभे राहत आहोत. ही संस्था केवळ संघटना नसून आपल्या हक्कांचे, सन्मानाचे आणि सुरक्षित भवितव्याचे व्यासपीठ आहे."

पनवेल शहर कार्यकारिणीच्या स्थापनेसाठी महाराष्ट्र अध्यक्ष मुकुंद शंकर कांबळे, महाराष्ट्र सचिव विजय जाधव, महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रकाश जाधव आणि महाराष्ट्र सहसचिव देविदास काका यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सर्व चालक-मालकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आणि संघटनेची भक्कम पायाभरणी झाली.

आज महाराष्ट्रातील हजारो ॲम्बुलन्स चालक-मालक विविध अडचणींना सामोरे जात आहेत. अपघात, आर्थिक संकट, कायदेशीर अडचणी, व्यवसायातील स्पर्धा आणि सामाजिक असुरक्षितता यामुळे अनेकांचे प्रश्न वाढत आहेत. अशा वेळी ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्था, महाराष्ट्र राज्य ही संघटना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार आहे.

"एक चालक अडचणीत असेल तर संपूर्ण संघटना त्याच्या पाठीशी उभी राहील, एक ॲम्बुलन्स मालक संकटात असेल तर संपूर्ण कुटुंब त्याला आधार देईल," हा संदेश या सभेतून देण्यात आला.

पनवेलमधून सुरू झालेली ही एकीची चळवळ आता संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचत असून, राज्यातील सर्व ॲम्बुलन्स चालक-मालकांनी आपले मतभेद विसरून संस्थेचे सदस्य व्हावे, संघटित व्हावे आणि आपल्या हक्कांसाठी एकत्र यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

"एकत्र या... संघटित व्हा... आणि आपल्या हक्कांसाठी, सन्मानासाठी व रुग्णसेवेच्या उज्ज्वल भविष्यासाठी

# पनवेल तालुक्यातील स्वच्छतेच्या प्रश्नावर मनसे आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात वाढत्या घनकचरा व्यवस्थापनाच्या समस्येमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून, याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गावागावांत कचऱ्याचे ढीग साचत असून स्वच्छतेचा अभाव निर्माण झाल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.मनसेचे पनवेल तालुका अध्यक्ष सुजित पावलस सोनावणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधत सांगितले की, हा प्रश्न नवीन नसून अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. मात्र अद्यापही यावर ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. पंचायत समिती पनवेल आणि संबंधित प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता तातडीने प्रभावी कृती करावी, अशी मागणी त्यांनी केली.ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छता, चांगले आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार असून गावांचा विकास केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात दिसला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. प्रशासनाने नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्वरित पावले उचलली नाहीत तर लोकशक्ती आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पनवेल तालुक्यातील प्रत्येक गाव, वाडी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी खंबीरपणे उभी असून न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरू ठेवणार असल्याचे सोनावणे यांनी स्पष्ट केले.




"आरोग्याचा प्रश्न हा राजकारणाचा विषय नाही, तर जनतेच्या जगण्याचा विषय आहे," तसेच "कचऱ्याचे ढीग नाही, विकासाचे नवे पर्व हवे," अशी भूमिका मनसेने मांडली आहे.

— सुजित पावलस सोनावणे
अध्यक्ष, पनवेल तालुका
महाराष्ट्र नवनिर्माण सेना.

# ढोर समाज आक्रमक; SC उपवर्गीकरणाला विरोध, बदर अहवाल जाहीर करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई(दत्ता खंदारे / प्रतिनिधी) :** अनुसूचित जातीच्या अंतर्गत उपवर्गीकरण 'अ, ब, क, ड' करण्याच्या निर्णयाला ढोर समाजाचा तीव्र विरोध आहे. या पार्श्वभूमीवर पुढील दिशा ठरवण्यासाठी आरक्षण हक्क संवर्धन समिती, महाराष्ट्र राज्यची विशेष बैठक १०जून २०२६ रोजी चेंबूर येथील 'कलादीप बंगला' येथे पार पडली. बैठकीचे आयोजन शिवसेना उपनेत्या मा.सौ.कलाताई शिंदे यांनी केले होते.

या बैठकीला मा.श्री. सुभाष साबणे (माजी आमदार),मा.श्री.ज्ञानराज चौगुले (माजी आमदार ),

मा.सौ.कलाताई शिंदे (शिवसेना उपनेत्या ),मा.श्री. राजेश खंदारे (सचिव,संत कक्कया विकास संस्था, धारावी ),मा.श्री. रमाकांत नारायणे( सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता ),मा. श्री.नरसिंग शेरखाने ( सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक ),मा.श्री.सूर्यकांत इंगळे ( कामगार नेते व समन्वयक ),मा.श्री.बाबुराव सावळे (जेष्ठ समाजसेवक,दिघा,नवी मुंबई ),मा.



श्री. व्यंकटराव शिंदे(अध्यक्ष,वीरशैव कक्कया समाज संस्था,मुंबई ),मा. ॲड.श्री.हरिश्चंद्र कोकणे ( कायदेतज्ज्ञ/ सदस्य ),मा.श्री.बालाजी सावळे ( समाजसेवक ),मा.श्री. हृदयनाथ खंदारे ( समाजसेवक, सांताक्रूझ ),मा.श्री.नरसिंग कावळे ( समाजसेवक ),मा.श्री.संजय इंगळे(खोपोली ),मा. श्री.संतोष साबणे (ठाणे )आदी समाज बांधव उपस्थित होते.

**यावेळी सविस्तर चर्चेअंती ३ ठराव सर्वानुमते संमत:**

१. न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करावा.

SC उपवर्गीकरणाच्या निर्णयाआधी मा. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल शासनाने त्वरित सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली. सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता रमाकांत नारायणे यांनी तयार केलेल्या सविस्तर निवेदनाचे वाचन करून घटनात्मक संरक्षण, आरक्षण कायदा व अनुच्छेदांच्या तरतुदींचे मुद्देनिहाय स्पष्टीकरण दिले. या निवेदनाला सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक नरसिंग शेरखाने यांनी पाठिंबा दिला. माजी आमदार सुभाष साबणे व ज्ञानराज चौगुले यांच्या मार्गदर्शनानंतर समितीच्या १२ प्रमुख सदस्यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन राज्य शासनाकडे सादर करण्याचा ठराव झाला. बैठकीनंतर साबणे व समन्वयक सूर्यकांत इंगळे यांनी मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मुख्य सचिव कार्यालयात हे निवेदन प्रत्यक्ष सादर केले.

**२.नवी मुंबईत राज्यस्तरीय परिषद**

वीरशैव ढोर कक्कय्या समाज व विविध समाज मंडळांचे पदाधिकारी, संस्था, पत्रकार व नगरसेवक यांना आरक्षण हक्कांविषयी जागृत करण्यासाठी नवी मुंबई येथे एकदिवसीय राज्यस्तरीय परिषद घेण्याचा निर्णय झाला.उपवर्गीकरणाचे फायदे-तोटे आणि समाजासमोरील प्रश्नांवर या परिषदेत चर्चा होणार आहे.

**3.शासनाने घाई करू नये**

बदर समितीचा अहवाल सार्वजनिक केल्याशिवाय आणि प्राप्त हरकतींचे पूर्ण निराकरण केल्याशिवाय शासनाने कोणताही निर्णय घेऊ नये, या भूमिकेवर सर्वांचे एकमत झाले.

बैठकीच्या आयोजनाबद्दल कलाताई शिंदे, कायदेशीर निवेदनाबद्दल रमाकांत नारायणे आणि मार्गदर्शनाबद्दल माजी आमदार श्री. सुभाष साबणे, माजी आमदार श्री. ज्ञानराज चौगुले यांचे आभार मानण्यात आले. बैठकीची सांगता समन्वयक सूर्यकांत इंगळे यांनी केली.

# युनिव्हर्सल ग्रुप पनवेल यांच्या वतीने अनोखा दुहेरी कार्यक्रम, गुणवंत विद्यार्थांचा सत्कार आणि 'आंबेडकर विरुद्ध आंबेडकर' एक प्रबोधनात्मक नाटकाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** युनिव्हर्सल ग्रुप पनवेल-रायगड तर्फे पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये बौद्ध समाजातील इयत्ता दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व समाजप्रबोधनाचा भाग म्हणून 'आंबेडकर विरुद्ध आंबेडकर' या प्रबोधनात्मक नाटकाचे आयोजन करण्यात आले होते.

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्त्वावर चालणाऱ्या युनिव्हर्सल ग्रुपच्या उपक्रमाला पनवेल मधील जनतेने उदंड प्रतिसाद दिला, कार्यक्रमाचे नीटनेटके व शिस्तबद्ध नियोजन आयोजकांनी केले होते, पनवेल तालुक्यातील 90 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा या ठिकाणी गौरव करण्यात



आला, या कार्यक्रमाला पनवेल तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील अनेकांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाचे व आयोजकांचे कौतुक केले, उपस्थित मान्यवरांचा ग्रुपच्या वतीने मानसन्मान करण्यात आला. 'आंबेडकर विरुद्ध आंबेडकर' या नाटकाला पनवेलमधील जनतेने भरभरून प्रतिसाद दिला. 'बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम ध्येय असले पाहिजे' हे बाबासाहेबांचे विचार आणि त्यांनी लिहिलेलं संविधान यांच्या विचारावरील नाटकाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले, आजचा भारतीय नेमका कसा हवा होता, आपल्याकडून त्यांच्या कोणत्या काय अपेक्षा होत्या यावर प्रभावी भाष्य करणारे एक प्रबोधनात्मक नाटक पनवेलकरांना अनुभवायला मिळालं. मागील पिढी आणि आत्ताची पिढी यामध्ये उत्साह पोटी ज्या काही चुका घडल्या असतील ते दाखवण्याचं काम मनोरंजक पद्धतीने या नाटकाच्या माध्यमातून झाले आहे आणि दोन्ही पिढीचा समतोल राखण्याचं काम हे नाटक करत आहे. नाटक पाहिल्यानंतर प्रेक्षकांनी दिलेल्या प्रतिक्रिया हीच खरी या नाटकाची पोचपावती ठरली. हे नाटकाचे आयोजन विनामूल्य करण्यात आले होते, अनेकांनी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, जेष्ठ काशिनाथ कांबळे, अनिल भाताणकर,आर. पी. आय. चे अध्यक्ष प्रभाकर कांबळे, सुनील वाघपंजे, कमलाकरदादा कांबळे, नरेश गायकवाड, वंचित चे आनंद गायकवाड, पोलीस पाटील कुणाल लोंढे, सचिन कांबळे, कुमार मेटांगे सर , नगरसेवक लतीफ शेख, युवा अध्यक्ष हेमराज म्हात्रे, सुनील कांबळे, जयदास कांबळे, पत्रकार निलेश सोनवणे सुभाष वाघपंजे, उद्योजक प्रवीण कांबळे, राहुल गायकवाड, कामगार नेते शरद कांबळे, संतोष गायकवाड, पोलीस अधिकारी अनिल गायकवाड, चंद्रकांत जाधव, पोलीस पाटील अर्चना बाबरे, अविनाश अडांगले आदी मान्यवर उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युनिव्हर्सल ग्रुपचे राज सदावर्ते, सुधीर पवार, प्रभाकर सावंत, सुनील वानखडे, आनंदराव जाधव, अमित साळवी, संतोष गोटे, संजय फडके, विकास गायकवाड,सचिन कांबळे, नवनीत गायकवाड तसेच युनिव्हर्सल ग्रुपची सर्व टीम यांनी कठोर परिश्रम घेतले.

# माहुर येथे माकप व किसान सभेची निदर्शने व शासनादेशाची केली होळी !

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी/सय्यद इसा :** शेतकरी कर्जमाफीतील सर्व जाचक अटीशर्ती रद्द करा, सर्व राबणाऱ्या शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, देवस्थान जमीन विधेयकाची स्थगिती रद्द करा, देवस्थान इनाम जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे त्वरित करा, व माहुर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना पिक विमा वाटप करा या मुख्य मागण्या घेऊन आज 11जून 2026 रोजी माकप व किसान सभेतर्फे नांदेड जिल्ह्यात माहुर तहसील कार्यालयासमोर निदर्शने करुन शासनादेशाची होळी करून निषेध करण्यात आले या आंदोलनात 150 पेक्षा जास्त कार्यकर्ते उपस्थित होते.





या आंदोलनाचे नेतृत्व कॉम्रेड शंकर सिडाम राज्य सहसचिव अखिल भारतीय किसान सभा कॉम्रेड किशोर पवार जिल्हा सचिव अखिल भारतीय किसान सभा कॉ.संजय मानकर,कॉ.डा . बाबा डाखोरे,कॉ.प्रसराम पारडे,कॉ.शंकर गंदमवार,कॉ. दिगांमबर आगीरकर, कॉ.डा. शुभा डाखोरे कॉ राजु पिसरवाड कॉ.सुभाष डाखोरे कॉ गणपत राठोड,प्रेमसींग चव्हाण,किसन जगदाळे, वसंत चव्हाण, विजय पिसरवार इत्यादींनी केले.

# समता जिल्हा परिषद शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अरविंद जाधव यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी /सय्यद इसा :** किनवट माहूर तालुक्यातील सहकार क्षेत्रातील एक महत्त्वाची संस्था म्हणून नावलौकिक असलेल्या समता जिल्हा परिषद शिक्षक व सहकारी पतसंस्था मर्यादित किनवट माहूरच्या अध्यक्षपदी शिक्षक भारती संघटनेचे माहूर तालुका अध्यक्ष अरविंद जाधव यांची तर उपाध्यक्षपदी सचिन कोंडापलकुलवार व



सचिवपदी भुजंग मसराम यांची एकमताने निवड करण्यात आली.

निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून श्री. दिपक चव्हाण सहकार अधिकारी यांनी भूमिका पार पाडली.

यावेळी संचालक श्री. राजु वाघमारे, गजानन निलकंठवार, शिवराज मुंडे, अश्वत घुले, राम बुसमवार, शमशेर खान, श्रीमती लतिका राठोड, कविता तोटावार, बंडू जाधव , विनोद गुरनुले व्यवस्थापक संजय कचकलवार उपस्थित होते.. निवडीबद्दल शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. चंद्रकांत कुणके, अमोल कुलकर्णी, जगजीतसिंघ ठाकुर, बालाजी गादगे, अजय राठोड, संतोष चव्हाण, रमेश चव्हाण, भगवान गायकवाड, प्रेम जाधव, वसंत राठोड, संजीत मुनेश्वर, ललिता जोशी, सुभाष चलवदे, रोहीत जाधव, कांबळे, सतिष कुरमे, उत्तम पवार, ज्ञानेश्वर चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे.

# महावितरणाचा निष्काळजीपणा ऐरोली अंधारात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** महावितरणच्या निष्काळजी आणि भोंगळ कारभाराचा आणखी एक नमुना ऐरोली सेक्टर-३ येथे समोर आला आहे. श्रीराम विद्यालयाच्या बाजूला असलेली विद्युत डीपी अक्षरशः जळून खाक झाली असून संपूर्ण परिसरातील नागरिकांना याचा मोठा फटका बसला आहे.गेल्या अनेक दिवसांपासून ऐरोलीकर रात्रीच्या वेळी होणाऱ्या वारंवार वीज खंडित होण्याच्या त्रासाने हैराण झाले आहेत. कधी वीज येते, कधी जाते याचा काही नेम उरलेला नाही. उकाड्याने जीव कासावीस होत असताना नागरिकांना रात्रभर जागून काढावी लागत आहे. नोकरदार वर्गाची झोप उडाली असून दुसऱ्या दिवशी कामावर जाणे देखील कठीण झाले आहे. बिल भरण्यात एक दिवस उशीर झाला तर वीज कापणारे महावितरण, नागरिकांच्या हालअपेष्टांची जबाबदारी घेणार का?" असा संतप्त प्रश्न आता ऐरोलीकर विचारत आहेत.



# कळंबोली पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी; घरफोडी प्रकरणाचा छडा लावून १३.७० लाखांचे सोन्याचे दागिने हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घरफोडीच्या गंभीर गुन्ह्याचा अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करून दोन आरोपींना उत्तर प्रदेशातून अटक करण्यात कळंबोली पोलिसांना यश आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोथे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली त्या वेळी गुन्हे प्रकटीकरण प्रमुख PSI अमोल चौगुले सहकारी पोलिस कॉन्स्टेबल महेंद्र गायकवाड, निलेश सोळुंखे,शरद मराठे यांची कौशल्य पूर्ण तपास करून आरोपीस पकडण्यात आले

आरोपींकडून चोरीस गेलेल्या मालापैकी तब्बल १३ लाख ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले असून या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संपूर्ण तपास पथकाचा नवी मुंबई पोलीस आयुक्त मा. मिलिंद भारंबे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

सदर गुन्ह्यात आरोपींनी भरदिवसा घरफोडी करून सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने, ९३ ग्रॅम चांदीचे दागिने व वस्तू तसेच १२ हजार रुपये रोख रक्कम असा मोठा ऐवज



लंपास केला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन कळंबोली पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान पोलिसांनी जवळपास ७० ते ८० ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले. तसेच आधुनिक तांत्रिक विश्लेषणाचा वापर करून गुन्ह्याशी संबंधित गुगल आयडी तसेच एकूण दहा मोबाईल क्रमांकांचे सखोल विश्लेषण करण्यात आले. या तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींची ओळख निश्चित करण्यात पोलिसांना यश आले.तपासादरम्यान आरोपी हे उत्तर प्रदेश राज्यातील आंबेडकर नगर जिल्ह्यात आपले अस्तित्व लपवून राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर विशेष तपास पथकाने तेथे जाऊन सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच एक आरोपी शेताच्या दिशेने पळून गेला. मात्र पोलिसांनी जवळपास ५०० मीटरपर्यंत पाठलाग करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार दुसऱ्या आरोपीलाही अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून चोरीच्या मालापैकी सुमारे १३ लाख ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. अत्यंत बारकाईने केलेला तपास, आधुनिक तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर, राज्याबाहेर जाऊन केलेली धाडसी कारवाई आणि चोरीचा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात मिळालेले यश यामुळे ही कारवाई विशेष उल्लेखनीय ठरली आहे.

या उत्कृष्ट तपासकार्याची दखल घेत मासिक गुन्हे आढावा बैठकीत नवी मुंबई पोलीस आयुक्त मा. मिलिंद भारंबे यांच्या हस्ते संपूर्ण तपास पथकाला प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कळंबोली पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली असून पोलीस दलाच्या कार्यक्षमतेबद्दल सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त केले जात आहे

# राजकारणात ‘पाटील’ अनेक, पण गळ्यातला ताईत एकच!

## बाळासाहेब पाटलांच्या वाढदिवसाला रॉयल गार्डनमध्ये कार्यकर्त्यांचा उडाला एकच जल्लोष!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेलच्या 'रॉयल गार्डन'मध्ये जे काही घडलं, ते पाहून अनेकांना जुने दिवस आठवले. राजकारणात सध्या 'पक्षांतराची' आणि 'निष्ठेची' जी काही उलथापालथ चालली आहे, त्या काळात गेली चाळीस वर्षं एकाच विचाराची, एकाच ध्येयाची मशाल हातात घेऊन चालणारा माणूस पाहिला की अंगावर रोमांच उभे राहतात! तो माणूस म्हणजे दुसरे-तिसरे कोणी नसून कोकण म्हाडाचे माजी सभापती आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील! काल त्यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी जो काही ‘उत्स्फूर्त जल्लोष’ केला, तो पाहून वाघाच्या काळजाचा माणूसही हरखून जावा, असा तो सोहळा होता!








अहो, वाढदिवस अनेकांचे होतात, हार-तुरे मिळतात, पेढे वाटले जातात आणि दुसऱ्या दिवशी लोक विसरूनही जातात. पण बाळासाहेबांचा हा अभिष्टचिंतन सोहळा म्हणजे केवळ वाढदिवस नव्हता, तर ती एका तपस्व्याच्या चार दशकांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाची ‘कृतज्ञता पावती’ होती! पनवेलच्या मातीत पाय घट्ट रोवून उभ्या असलेल्या या नेत्याला शुभेच्छा देण्यासाठी जनसागर उसळला होता. काय तो कार्यकर्त्यांचा उत्साह! काय तो जल्लोष!या सोहळ्याला आमदार विक्रांत पाटील, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, तरुण तडफदार नेते प्रीतम म्हात्रे, रमेश गुडेकर, रविशेठ पाटील, तसेच प्रांताधिकारी पवन चांडक, विजय कडू, गणेश कोळी,भालचंद्र जुमालेदार यांच्यासह अनेक दिग्गजांची मांदियाळी जमली होती. राजकीय मतभेद बाजूला ठेवून, बाळासाहेबांच्या 'दिलदार' व्यक्तिमत्त्वाला सलाम करण्यासाठी ही सर्व मंडळी एकत्र आली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बाळासाहेबांबद्दलचा आदर स्पष्ट दिसत होता. कार्यक्रमात जेव्हा बाळासाहेबांच्या कार्याचा गौरव सुरू झाला, तेव्हा आम्हांला राहवून राहवून वाटलं की, राजकारणात 'ऐनवेळी' तिकीट मिळवून मोठे होणारे अनेक असतात; पण सामान्य कार्यकर्त्याचा सतरंजी उचलण्यापासून ते 'नेतृत्व' गाजवण्यापर्यंतचा प्रवास करायला मनगटात आणि काळजात ताकद लागते. ती ताकद बाळासाहेबा त्यांनी दाखवून दिली आहे. पक्ष संघटनेची वीण घट्ट करताना, जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरताना त्यांनी कधी स्वतःच्या सुखाचा विचार केला नाही.

जेव्हा बाळासाहेब पाटील स्वतः मनोगत व्यक्त करायला उभे राहिले, तेव्हा संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. पण जेव्हा त्यांनी बोलायला सुरुवात केली, तेव्हा अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. अहो, चार दशकांचा काळ काही लहान नाही! बाळासाहेब अत्यंत भावूक होऊन म्हणाले, “संघटना उभी करताना अंगावर अनेक काटे आले, कठीण प्रसंग आले. पण माझ्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आणि माझ्या या निस्वार्थी कार्यकर्त्यांनी जी खंबीर साथ दिली, त्यामुळेच मी प्रत्येक वादळाला तोंड देऊ शकलो.” आपल्या यशाचं सगळं श्रेय स्वतःकडे न घेता कार्यकर्त्यांच्या झोळीत टाकणारा नेता आजच्या काळात दुर्मिळच! “गेली ४० वर्षे मी जी काही सेवा करू शकलो, ते केवळ तुमच्या प्रेमामुळे. आज मागे वळून पाहताना समाधान वाटतं,” असे जेव्हा ते म्हणाले, तेव्हा राजाने आपल्या प्रजेला दिलेली ती एक प्रेमाची हाकच होती. रॉयल गार्डनच्या परिसरात जो काही आनंदाचा पाऊस पडत होता, तो पाहून आम्ही एवढंच म्हणू की, बाळासाहेब पाटील हे केवळ एक नाव नाही, तर तो पनवेलच्या राजकीय संस्कृतीचा एक 'जिवंत इतिहास' आहे. राजकारणात 'पाटील' अनेक होतात, पण कार्यकर्त्यांच्या गळ्यातला ताईत होऊन राहणारा 'बाळासाहेब' सारखा पाटील एखादाच असतो, अश्या भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या.

## मोदींच्या ऐतिहासिक कार्यकाळानिमित्त घाटकोपर मध्ये भाजपाचा जनसेवेचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर, (केतन भोज) :** देशाचे लोकप्रिय आणि सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषविणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या कामगार आघाडीच्या वतीने सामाजिक उपक्रमाचे आयोजन घाटकोपर पश्चिम रेल्वे स्टेशन परिसरात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन कामगार आघाडीचे मुंबई सचिव साहेबराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आमदार राम कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत रिक्षाचालक व प्रवाशांना मोफत हायड्रेशन किट वाटप,ORS, पिण्याचे पाणी,ताक आणि






वडापावाचे वाटप करण्यात आले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा मिळावा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांचा तसेच रिक्षा चालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा सौ.अश्विनी मते,ईशान्य मुंबई जिल्हा महामंत्री चंद्रकांत मालकर,जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे,रवि पुज तसेच विविध मंडळ अध्यक्ष,वॉर्ड अध्यक्ष आणि पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रोळी पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी केले.

## पनवेल महानगरपालिकेकडून पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांना नोंदणीचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी दिपक कोळवणकर :** राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 अंतर्गत 3 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खाजगी केंद्रांनी शासनाच्या नियमानुसार नोंदणी करणे आवश्यक असल्याचे आवाहन प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने करण्यात आले आहे.



या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व पूर्व प्राथमिक शाळा व शिक्षण केंद्रांनी आपल्या संस्थेची नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार 5+3+3+4 या शैक्षणिक आकृतीबंधातील पहिल्या पाच वर्षांच्या टप्प्याला ‘पायाभूत स्तर’ म्हणून संबोधण्यात आले आहे. या स्तरामध्ये 3 ते 6 वर्षे वयोगटातील पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन वर्षे तसेच इयत्ता पहिली व दुसरीचा समावेश करण्यात आला आहे.

या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील प्री-स्कूल, नर्सरी, ज्युनिअर केजी आणि सीनिअर केजी (Pre-School, Nursery, Jr. KG व Sr. KG) चालविणाऱ्या सर्व खाजगी केंद्रांची अधिकृत नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने Pre School Registration Portal (ECCE) सुरू केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या केंद्रांची सर्वसाधारण माहिती, व्यवस्थापनाची माहिती, विद्यार्थी संख्या, भौतिक सुविधा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची माहिती तसेच आवश्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करण्याबाबत सविस्तर सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

शासनाच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण क्षेत्रातील डिजिटलायझेशनला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व पूर्व प्राथमिक शाळा व शिक्षण केंद्रांनी www.education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील Pre School Registration Portal (ECCE) या विभागामध्ये जाऊन आवश्यक माहिती भरून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

पूर्व प्राथमिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व संस्थांनी शासनाच्या नियमांचे पालन करून वेळेत नोंदणी पूर्ण करावी, जेणेकरून राज्यातील बालशिक्षण व्यवस्थेची माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध होऊन शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असेही महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. :::

## खासदार डॉ . श्रीकांत शिंदे यांच्या मागणीची परिवहन मंत्र्यांकडून तात्काळ दखल

### ॲप-आधारित टॅक्सी कंपन्यांवर मंत्री प्रताप सरनाईक यांचे कारवाईचे निर्देश

**दैनिक युवक आधार**
**कल्याण / प्रतिनिधी :** ॲप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवांच्या माध्यमातून प्रवाशांकडून जबरदस्तीने टिप मागणे, अतिरिक्त रकमेची सक्ती करणे तसेच प्रवाशांच्या अडचणीचा गैरफायदा घेत आर्थिक शोषण करण्याच्या प्रकारांविरोधात कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी केलेल्या मागणीची राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ दखल घेत संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन आयुक्तांना दिले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून विविध ॲप-आधारित टॅक्सी सेवांबाबत प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी समोर येत होत्या. प्रवास स्वीकारल्यानंतर अतिरिक्त टिप किंवा जादा रकमेची मागणी करणे, ती न मिळाल्यास प्रवास रद्द करणे अथवा प्रवाशांना मानसिक त्रास देणे असे प्रकार वाढल्याने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ प्रतिक्रिया देत प्रवाशांकडून जबरदस्तीने टिप मागण्याचा प्रकार अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले. तसेच संबंधित कंपन्यांच्या कारभाराची चौकशी करून आवश्यक ती कठोर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन आयुक्तांना देण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. यावेळी परिवहन मंत्री सरनाईक यांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्याबद्दल खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभारही व्यक्त केले. ॲप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवा देणाऱ्या कंपन्यांचा मनमानी कारभार रोखण्यासाठी परिवहन विभागाकडून महत्त्वपूर्ण उपाययोजना राबविण्यात येणार असून या क्षेत्रासाठी लवकरच नवीन ॲग्रीगेटर धोरण जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**मागणी काय होती ?**

**ॲप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवांकडून प्रवाशांवर लादल्या जाणाऱ्या या अन्यायकारक पद्धतीविरोधात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना कठोर कारवाई करण्याचे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले होते. तर गरजेच्या वेळी प्रवाशांना वेठीस धरणे, त्यांची अडचण ओळखून आर्थिक शोषण करणे आणि जादा रक्कम देण्यास भाग पाडणे, हा प्रकार ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा आहे. ही केवळ चुकीची व्यावसायिक पद्धत नसून ग्राहकांना अक्षरशः ओलीस ठेवण्यासारखी बाब आहे. ग्राहकांकडून स्वेच्छेने मिळणारी टिप ही सेवेच्या गुणवत्तेची पावती असते; मात्र टिप किंवा अतिरिक्त शुल्कासाठी दबाव टाकणे, सेवा नाकारण्याची धमकी देणे किंवा ग्राहकांना मानसिक त्रास देणे हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. ग्राहकांना पारदर्शक, न्याय्य आणि सुरक्षित सेवा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे अशा शोषणात्मक आणि ग्राहकविरोधी प्रकारांवर तातडीने अंकुश ठेवून संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार डॉ.शिंदे यांनी केली होती.**

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रवाशांच्या हितासाठी सातत्याने आवाज उठविला असून ग्राहकांना पारदर्शक, न्याय्य आणि सुरक्षित सेवा मिळावी यासाठी त्यांनी ही मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर राज्य सरकारने तात्काळ पावले उचलल्याने लाखो प्रवाशांना दिलासा मिळेल.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल तालुक्यातील खेरणे गाव परिसरात एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत. सदर महिलेचे अंदाजे वय 45 ते 50 वर्षे, अंगाने सडपातळ, डोक्यावरील केस काळे साधारण वाढलेले, चेहरा उभट, नाक सरळ, रंग सावळा, उंची 5 फुट असून अंगात काळ्या रंगाचा फुल बाह्याचा गाऊन घातलेला आहे. तसेच डोळे काळे आहेत. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा सहा.पो.नि.अर्चना कुदळे मो.नं.8425843301 येथे संपर्क साधावा.



## सिल्लोडमध्ये ऑनलाईन खत विक्रीचा खोळंबा; ऑफलाईन प्रक्रियेची मागणी करत आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** खरीप हंगामाच्या तोंडावर खत खरेदीसाठी राबवलेली ऑनलाईन प्रणाली शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. नेटवर्क समस्या, बायोमेट्रिक त्रुटी आणि तांत्रिक अडचणींमुळे खते मिळण्यास विलंब होत असल्याने, खत विक्रीची प्रक्रिया पूर्वीप्रमाणे ऑफलाईन पद्धतीने सुरू करावी, अशी मागणी तालुका कृषी




अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सध्या सुरू असलेल्या ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकरी आणि कृषी सेवा केंद्र चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. क्यूआर कोड स्कॅनिंगमधील अडथळे आणि नेटवर्कच्या समस्यांमुळे तासनतास ताटकळत उभे राहूनही शेतकऱ्यांच्या पदरी निराशा येत आहे. पेरणीची कामे तोंडावर असताना खते वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

जोपर्यंत ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक दोष दूर होत नाहीत, तोपर्यंत ऑफलाईन पद्धतीने खत विक्री सुरू ठेवावी, जेणेकरून पेरणीची कामे सुरळीत पार पडतील, असे निवेदनात नमूद केले आहे. तसेच, तालुक्यात युरिया, डीएपी, एनपीके, एसएसपी व एमओपी या खतांचा नेमका किती साठा उपलब्ध आहे, याची माहिती जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.यावेळी भाजपा भवन मंडळ अध्यक्ष एकनाथ हिवाळे, ईश्वर कुंटे व भाऊसाहेब उबाळे यांनी प्रशासनाला कडक इशारा दिला आहे. "शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून प्रशासनाने यावर तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा पवित्रा शिष्टमंडळाने घेतला आहे.

## बेकायदेशीर गावठी हातभट्टीच्या दारूवर कारवाई करा अन्यथा पोलिसांना हातभट्टीची दारू भेट देणार– राजेंद्र पाटील

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** वहाळ परिसरात बेकायदेशीरित्या गावठी हातभट्टी आणि इतर दारूची विक्री आणि उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून यावर कारवाई करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र महादेव पाटील यांनी उलवे पोलिसांकडे पत्राद्वारे केली. पिंपरी -चिंचवड परिसरात काही दिवसांपूर्वी विषारी दारूमुळे अनेकांचा मृत्यू झाला. असाच प्रकार वहाळ परिसरात होऊ शकतो. वहाळमध्ये दारूबंदी असताना देखील मोठ्या प्रमाणावर गावठी हातभट्टी आणि इतर दारूची विक्री होत असल्याचे राजेंद्र पाटील यांनी सांगितले. उलवे पोलीस ठाण्याच्या हद्दीत नियमबाह्य दारू निर्मिती



आणि दारू विक्रीचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असून पिंपरी- चिंचवड सारखी परिस्थिती उद्भवू नये यासाठी पोलिसांनी दारू निर्मिती करणाऱ्यांवर व विक्री करणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी राजेंद्र पाटील यांनी केली. कारवाई करण्यात पोलीस असमर्थ ठरल्यास हातभट्टीची दारू पोलीस स्टेशनला भेट देण्यात येईल असेही पाटील यांनी सांगितले.

# मातोश्री पानंद रस्ता योजनेअंतर्गत नागरा, बरबसपुरा व टेमनी येथे दर्जेदार काम; ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया तालुका राज्यातील अनेक भागांमध्ये मातोश्री पानंद रस्ता योजनेतील कामांच्या दर्जाबाबत व भ्रष्टाचाराच्या आरोपांबाबत चर्चा सुरू असताना, गोंदिया तालुक्यातील नागरा, बरबसपुरा आणि टेमनी येथे झालेल्या कामांबाबत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. संबंधित ठिकाणी रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्याचे सांगत ग्रामस्थ, शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य व सरपंचांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत.

**नागरा येथे स्मशानभूमीच्या रस्त्याचा प्रश्न सुटला**

नागरा गावात स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत होता. त्यामुळे गावातील मृत व्यक्तींचे अंत्यसंस्कार करण्यासाठी नागरिकांना दुसऱ्या गावातील स्मशानभूमीचा आधार घ्यावा लागत होता. यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

मात्र मातोश्री पानंद रस्ता योजनेअंतर्गत रस्ता तयार झाल्यानंतर आता गावातील मृत व्यक्तींचे अंत्यविधी गावातीलच स्मशानभूमीत करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबत ग्रामपंचायत सदस्यांनी समाधान व्यक्त करत आमदार विनोद अग्रवाल यांचे आभार मानले आहेत.

ग्रामपंचायत सदस्य म्हणाले,

"नागरा गावासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा होता. अनेक वर्षांपासून नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. आता रस्ता तयार झाल्यामुळे स्मशानभूमीपर्यंत पोहोचणे सोपे झाले असून गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासाठी आमदार विनोद अग्रवाल तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे आम्ही आभार व्यक्त करतो."



**बरबसपुरा येथे शेतकऱ्यांना दिलासा**

बरबसपुरा परिसरात शेताकडे जाणाऱ्या मार्गावर नदी असल्यामुळे ये-जा करणे अत्यंत कठीण होते. विशेषतः पावसाळ्यात शेतकऱ्यांना जीव मुठीत धरून नदी पार करून शेतात जावे लागत होते. त्यामुळे शेतीची कामे, शेतीमालाची वाहतूक आणि दैनंदिन हालचालींमध्ये मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या.

मात्र आता मातोश्री पानंद योजनेतून बांधण्यात आलेल्या रस्त्यामुळे हा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला आहे. गावकऱ्यांच्या मते, कामामध्ये चांगल्या दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून रस्ता मजबूत व गुणवत्तापूर्ण तयार झाला आहे.

स्थानिक शेतकरी म्हणाले,

"पूर्वी शेतात जाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर व्हायची. आता रस्ता तयार झाल्यामुळे ये-जा सोयीस्कर झाली आहे. काम चांगल्या दर्जाचे झाले असून आम्ही समाधान व्यक्त करतो."

**टेमनी येथे २०० ते ३०० एकर शेतीला मिळाला मार्ग**

टेमनी येथील सरपंच पटले यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, गावातील जवळपास २०० ते ३०० एकर शेतीकडे जाण्यासाठी योग्य रस्ता उपलब्ध नव्हता. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

मात्र आता मातोश्री पानंद रस्ता योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्यामुळे शेतकऱ्यांची समस्या दूर झाली आहे. रस्ता दर्जेदार पद्धतीने तयार करण्यात आला असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत असल्याचे त्यांनी सांगितले.

सरपंच पटले म्हणाले,

"जवळपास २०० ते ३०० एकर शेतीकडे जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता नव्हता. आता मात्र रस्ता चांगल्या प्रकारे तयार झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. या कामासाठी आमदार विनोद अग्रवाल तसेच कामाची देखरेख करणाऱ्या अभियंत्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो."

**गुणवत्तापूर्ण कामाबद्दल ग्रामस्थ समाधानी**

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अभियंत्यांनी वेळोवेळी कामाची पाहणी करून गुणवत्तेवर विशेष लक्ष दिले. त्यामुळे कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाली असून नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळत आहे.

राज्यात काही ठिकाणी मातोश्री पानंद योजनेबाबत विविध चर्चा होत असल्या तरी नागरा, बरबसपुरा आणि टेमनी येथील ग्रामस्थांनी मात्र कामाच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त करत आमदार विनोद अग्रवाल आणि संबंधित अभियंत्यांचे आभार मानले आहेत.

## कर्दनवाडीच्या पृथ्वीराज मुळीक यांची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंटपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील लासुर्णे येथील कर्दनवाडीसारख्या ग्रामीण भागातील सुपुत्र पृथ्वीराज मुळीक यांची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट पदावर निवड झाली आहे. अत्यंत कठीण आणि स्पर्धात्मक प्रक्रियेत यश मिळवत त्यांनी हे मानाचे पद प्राप्त केल्याने संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलात अधिकारी बनणे हे लाखो तरुणांचे स्वप्न असते. मात्र हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक कठीण टप्प्यांतून जावे लागते. उमेदवारांना सर्वप्रथम एनडीए (NDA) सारख्या प्रतिष्ठित परीक्षा उत्तीर्ण कराव्या लागतात. त्यानंतर सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (SSB) मुलाखत आणि वैद्यकीय चाचण्यांसारख्या आव्हानात्मक प्रक्रियेला सामोरे जावे लागते. या सर्व टप्प्यांमध्ये यश मिळवल्यानंतरच लष्करी प्रशिक्षणासाठी उमेदवारांची अंतिम निवड केली जाते.

पृथ्वीराज मुळीक यांचे प्राथमिक शिक्षण श्री वेंकटेश्वरा इंग्लिश मीडियम स्कूल, कळंब-वालचंदनगर येथे झाले असून माध्यमिक शिक्षण त्यांनी सातारा सैनिक स्कूलमध्ये पूर्ण केले. लहानपणापासूनच सैन्यदलात दाखल होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते. दहावीत असतानाच त्यांनी विविध स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली होती. त्याच जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी लेफ्टनंट पदाची परीक्षा उत्तीर्ण करत हे यश संपादन केले.

बारावीनंतर सैन्यदलातील मुख्य परीक्षेसाठी देशभरातून सुमारे पाच ते सहा लाख विद्यार्थी बसले होते. त्यापैकी वीस हजार विद्यार्थी पुढील टप्प्यासाठी पात्र ठरले. त्यानंतर मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) प्रक्रियेसाठी त्यांना बोलावण्यात आले. या प्रक्रियेत केवळ १३४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले.मात्र उपलब्ध जागा फक्त ९० असल्याने अंतिम निवड देशभरातील ९० उमेदवारांचीच करण्यात आली. या अत्यंत कठीण स्पर्धेत पृथ्वीराज मुळीक यांनी आपले स्थान निश्चित केले.पृथ्वीराज यांचे वडील पोपटराव मुळीक यांचीही मुलाने सैन्यदलात जाऊन देशसेवा करावी, अशी मनापासून इच्छा होती. मुलाने आपल्या जिद्दीच्या बळावर ती पूर्ण केल्याने संपूर्ण मुळीक परिवाराने समाधान व्यक्त केले आहे.ग्रामीण भागातील युवकांसाठी पृथ्वीराज मुळीक यांचे हे यश प्रेरणादायी ठरत असून, कठोर परिश्रम, सातत्य आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा असेल तर कोणतेही स्वप्न साकार करता येते, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातील नागरिक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मुख्यालयी निवासाच्या अटी शिथिल करा; शिक्षक संघटनांची आ. अब्दुल सत्तार यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड येथील आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुख्यालय निवाससंदर्भातील विविध अडचणी मांडल्या. यावेळी शिक्षक प्रतिनिधींनी आपल्या मागण्यांचे निवेदन आमदार अब्दुल सत्तार यांना सादर केले.




राज्य शासनाने शिक्षकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केले असले तरी गावांमध्ये व शाळांच्या मुख्यालयी शासकीय निवासस्थानांची व्यवस्था उपलब्ध नसल्याने शिक्षकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी भाड्याने राहण्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध नसल्याने शिक्षकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे शासकीय निवासस्थानांची पुरेशी व्यवस्था होईपर्यंत शिक्षकांवर मुख्यालयी वास्तव्यासंदर्भात कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करू नये, अशी मागणी शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी शिक्षक प्रतिनिधींनी मुख्यालय निवासाच्या अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या व्यावहारिक अडचणींची माहिती देत शासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी व याबाबत आमदार अब्दुल सत्तार यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

**•शिक्षकांच्या मागण्या शासनस्तरावर मांडणार: आ. अब्दुल सत्तार•**

शिक्षकांच्या मागण्या ऐकून घेतल्यानंतर आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, "शासनाने घेतलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

मात्र त्याचवेळी शिक्षकांच्या समस्या आणि वास्तव परिस्थिती समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुख्यालयी निवासाच्या संदर्भात शिक्षकांना येणाऱ्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येतील. शासनाचे धोरण आणि शिक्षकांचे हित यांचा समतोल साधणारा मार्ग काढण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल," असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेचे जिल्हाध्यक्ष देविदास सांगळे, शिक्षक भारती संघटनेचे विभागीय संपर्कप्रमुख रमेश नन्ने, जितेंद्र पानपाटील, दत्तू हावळे, सज्जन टाकसाळे, सदाशिव बडक, रवींद्र मोरे, सुनील जाधव, प्रकाश गाडेकर, संजय शेजुळ, प्रमोद वरपे, गजानन देवकर, मोहसीन शेख, एस. के. काझी, एस. एस. बावस्कर, एस. आर. राऊत, एम. के. सातव आदी शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इन-स्पेसकडून टेक्नोलॉजी अडॉप्शन फंड

## अवकाश क्षेत्रातील तीन भारतीय स्टार्टअप्स निधीसाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :** भारतीय राष्ट्रीय अवकाश प्रोत्साहन आणि प्राधिकरण केंद्र (इन-स्पेस: IN-SPACe) ने आपल्या तंत्रज्ञान अवलंब निधी (टेक्नोलॉजी अडॉप्शन फंड - TAF) योजनेअंतर्गत निधीसाठी अवकाश क्षेत्रातील तीन भारतीय स्टार्टअप्सची निवड केली आहे. ॲस्ट्रोबेस स्पेस टेक्नॉलॉजीज, सॅटस्युअर ॲनालिटिक्स इंडिया आणि टीएम2स्पेस टेक्नॉलॉजीज या भारतीय बिगर-सरकारी संस्थांची (NGEs) पहिला गट म्हणून निवड झाली आहे. इस्रो, उद्योग आणि अंतर्गत व्यापार वृद्धी विभाग (DPIIT), विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (DST), उद्योग क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि IN-SPACe यांच्या सदस्यांचा समावेश असलेल्या तज्ज्ञ समितीने बहु-स्तरीय आणि कठोर मूल्यमापन प्रक्रिया पार पाडल्यानंतर या तीन स्टार्टअप्सची आर्थिक सहाय्यासाठी निवड केली. भारताच्या स्वदेशी क्षमतांना बळकटी देणे आणि अवकाश क्षेत्रातील जागतिक स्पर्धात्मकता वाढविणे हे उद्दिष्ट ठेवून परिवर्तनकारी अवकाश तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी त्यांना हे पाठबळ दिले जाणार आहे.



बंगळुरूस्थित अवकाश स्टार्टअप ॲस्ट्रोबेस स्पेस टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड अवकाश प्रक्षेपण वाहनांसाठी हाय थ्रस्ट क्लोज्ड-सायकल लिक्विड रॉकेट इंजिन (800 kN) विकसित करणार आहे.बंगळुरूस्थित अवकाश विश्लेषण कंपनी सॅटस्युअर ॲनालिटिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड 'धारिणी' नावाचे मोठे पृथ्वी निरीक्षण मॉडेल (Large Earth Observation Model - LOM) विकसित करणार आहे. हे मॉडेल रिमोट सेन्सिंग उपयोजनांसाठी भारताचा मूलभूत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्लॅटफॉर्म म्हणून कार्य करण्यासाठी तयार केले जात आहे.

हैदराबाद स्थित टीएम2स्पेस टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड उपग्रहांसाठी स्वदेशी एआय-सक्षम स्टार ट्रॅकर प्रणाली विकसित करणार आहे. ही प्रणाली उच्च-रिझोल्यूशन इमेजिंग आणि दळणवळण मोहिमांसाठी आवश्यक असलेली अचूक दिशानियंत्रण क्षमता उपलब्ध करून देईल. या प्रकल्पांतर्गत CubeSats साठी StarSense Lite आणि 50 किलोपेक्षा जास्त वजनाच्या उपग्रहांसाठी StarSense Pro विकसित केले जाईल.

डॉ.पवन गोएंका,अध्यक्ष, इन-स्पेस म्हणाले,"तंत्रज्ञान अवलंब निधी (TAF) अंतर्गत या प्रकल्पांची निवड ही भारतीय खाजगी संस्थांना जागतिक अवकाश क्षेत्रातील अग्रणींमध्ये रूपांतरित करण्याच्या आमच्या ध्येयातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या निधीच्या माध्यमातून प्रारंभिक विकास टप्पा आणि व्यावसायिक यश यांमधील महत्त्वाची दरी भरून काढण्याची आमची संकल्पना आहे. हे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत आम्ही खाजगी क्षेत्राला अत्याधुनिक अवकाश तंत्रज्ञानावर काम करण्यासाठी सक्षम करत आहोत. हे प्रकल्प केवळ नाविन्यपूर्ण संकल्पना नसून, ते प्रत्यक्ष वापरासाठी तयार असलेले व्यावहारिक आणि बाजारपेठाभिमुख उपाय आहेत.

## घाटंजी येथे आरुष शिरपुरे यांच्या जन्म नोंदणीसाठी जाहीर प्रकटन प्रसिद्ध; हरकती मागविल्या

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटंजी येथील रहिवासी आरुष दुर्गादास शिरपुरे यांच्या जन्म नोंदणीबाबत तहसीलदार कार्यालयाकडून एक जाहीर प्रकटन जारी करण्यात आले आहे. आरुष यांचा जन्म १४ फेब्रुवारी २०२० रोजी घाटंजी येथे झाला होता, परंतु स्थानिक नगर परिषदेच्या जन्म-मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये या जन्माची नोंद झालेली नाही. या कारणास्तव, जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ च्या नियमांनुसार आरुष यांच्या जन्माची नोंद नगर परिषदेत करून जन्माचा दाखला मिळावा, यासाठी त्यांचे वडील दुर्गादास गणपत शिरपुरे यांनी तहसीलदार कार्यालय घाटंजी येथे अर्ज केला आहे.

या जन्म नोंदणी प्रकरणावर जर कोणाचाही काही आक्षेप किंवा हरकत असेल, तर त्यांनी हे प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपले आक्षेप लेखी स्वरूपात पुराव्यांसह सादर करावेत. हे आक्षेप निबंधक (जन्म-मृत्यू) नगर परिषद घाटंजी किंवा ग्राम महसूल अधिकारी घाटंजी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. मुदत संपल्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींवर विचार केला जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

## सिल्लोडमध्ये वनविभागाची धडक कारवाई: ४ लाखांचा खैर लाकूडसाठा व पीकअप वाहन जप्त

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड शहरातील सारा सिटी परिसरात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या खैर प्रजातीच्या लाकडावर वनविभागाच्या पथकाने धडक कारवाई करत सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि. ९) रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

वनविभागाच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, रात्री ११ वाजण्याच्या सुमारास सारा सिटी परिसरात छापा टाकण्यात आला. यावेळी रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात खैर लाकडाचा साठा आढळून आला. घटनास्थळी एक महिंद्रा बोलेरो पीकअप वाहन (क्रमांक MH 43 AD 1922) उभे होते. वनविभागाच्या पथकाला पाहताच चालकाने अंधाराचा फायदा घेत वाहन सोडून पळ काढला.

तपासणीत वाहनात खैर लाकडाचे नग आणि निम प्रजातीच्या लाकडाच्या पाट्या आढळून आल्या. वनविभागाने सुमारे १३ टन (अंदाजे १५ घनमीटर) खैर लाकूड आणि पीकअप वाहन असा एकूण ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

जप्त केलेला माल शासकीय डेपोत सुरक्षित जमा करण्यात आला आहे. याप्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई मुख्य वनसंरक्षक प्रमोद चंद लाकरा व उपवनसंरक्षक माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक स्वप्नील भामरे, वनपरिक्षेत्र अधिकारी यशपाल दिलपाक, वनपाल रेखा बरबडे, मनोज कांबळे, तसेच वनरक्षक साईनाथ पवार, गणेश परदेशी, अजीम शेख, विजय कुंटे, सागर राजपूत, विशाल जाधव, अनिल इंगळे, कल्याण खोकड, एच. एस. सिद्दीकी आणि वाहन चालक विलास नरवाडे यांच्या पथकाने पार पाडली.

या मोहिमेत सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर कायंदे व पोलीस नाईक एस. सी. मोबिन यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# बोर्ली निधी अपहार प्रकरणात नवा स्फोट! तक्रारदाराच्या नावाने बनावट पत्र तयार करून चौकशी दडपण्याचा प्रयत्न?

## "तक्रारदाराच्या नावाने कथित खोटी सही, अभिलेख फेरफाराचा आरोप; प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह"

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : मुरुड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली येथील वित्त आयोग निधी आणि ग्रामनिधी अंतर्गत झालेल्या कथित आर्थिक अनियमितता व निधी अपहार प्रकरणाला आता नवे आणि गंभीर वळण मिळाले आहे. लाखो रुपयांच्या विकासकामांमधील गैरव्यवहारांच्या आरोपांची चौकशी सुरू असतानाच, तक्रारदाराच्या नावानेच कथित बनावट पत्र तयार करून संपूर्ण चौकशी प्रक्रियेला दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. त्यामुळे या प्रकरणामागे नेमके कोणाचे हात आहेत आणि दोषींना वाचवण्यासाठी प्रशासनातील काही मंडळी प्रयत्नशील आहेत का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.माहिती अधिकार कार्यकर्ते प्रतिक प्रमोद कणगी यांनी १६ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती मुरुड येथे लेखी तक्रार दाखल करून वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप केला होता. या तक्रारीनंतर त्यांनी पंचायत समिती, जिल्हा परिषद रायगड तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला.

अखेर १ जानेवारी २०२६ रोजी पंचायत समितीमार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी व चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान गणेश आळी कोळी जमातीसाठी नरहरी ते नांदगावकर घरापर्यंतचा रस्ता तसेच सुरई परिसरातील गटार बांधकाम या कामांमध्ये गंभीर तफावत असल्याचा दावा करण्यात आला. अभिलेखांतील छायाचित्रे, खर्च दाखले आणि प्रत्यक्ष ठिकाणची परिस्थिती यामध्ये मोठा फरक असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणाची गंभीर दखल घेत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनीही जिल्हा परिषद रायगडला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले होते. मात्र चौकशी होऊन अनेक महिने उलटले तरी संबंधित सरपंच, ग्रामसेवक, अभियंता, ठेकेदार किंवा जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस प्रशासकीय अथवा फौजदारी कारवाई झालेली नाही. त्यामुळे चौकशी फक्त कागदोपत्रीच राहिली आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.दरम्यान, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या कागदपत्रांमधून आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. तक्रारदार प्रतिक कणगी यांच्या नावाने दिनांक २० मार्च २०२६ चे एक पत्र अधिकृत अभिलेखात समाविष्ट करण्यात आल्याचे आढळले आहे. मात्र त्या पत्रावरील सही ही स्वतःची नसून ती बनावट असल्याचा गंभीर दावा प्रतिक कणगी यांनी केला आहे.सदर पत्रामध्ये मूळ तक्रारीतील अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत भूमिका बदलल्याचे दिसून येत असल्याने या पत्राची सत्यता, ते कोणी तयार केले, अभिलेखात ते कसे




दाखल झाले आणि त्यामागील हेतू काय होता, याबाबत संशय अधिकच गडद झाला आहे. चौकशी प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी किंवा दोषींना संरक्षण देण्यासाठी हा प्रकार घडवून आणण्यात आला का, याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.या पार्श्वभूमीवर प्रतिक कणगी यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुरुड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांच्याकडे स्वतंत्र लेखी तक्रार दाखल केली आहे. कथित बनावट पत्र, खोटी सही, शासकीय अभिलेखांमध्ये फेरफार आणि चौकशी प्रक्रियेत हस्तक्षेप करणाऱ्या व्यक्तींची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या परिपत्रकानुसार निधी अपहार, आर्थिक अनियमितता आणि खोटे दस्तऐवज तयार करणे ही गंभीर स्वरूपाची प्रकरणे असून त्यामध्ये संबंधित अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार आणि इतर जबाबदार व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद आहे. मात्र बोर्ली प्रकरणात अद्याप कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**शासन आणि प्रशासनाला थेट सवाल**

बोर्ली ग्रामपंचायतीतील विकासकामांमध्ये गैरव्यवहार झाले नसतील तर चौकशी अहवाल सार्वजनिक का केला जात नाही?

जर गैरव्यवहार झाले असतील तर दोषींवर कारवाई का होत नाही?

तक्रारदाराच्या नावाने कथित बनावट पत्र अभिलेखात कसे आले?

खोटी सही करून शासकीय कागदपत्रांमध्ये फेरफार करणाऱ्यांना कोणाचे संरक्षण आहे?

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ग्रामनिधी आणि वित्त आयोगाचा पैसा नेमका कुणाच्या खिशात गेला?

या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत बोर्ली निधी अपहार प्रकरणावरील संशय कायम राहणार असून, प्रशासनाने आता मौन सोडून ठोस भूमिका घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

अन्यथा हा विषय राज्य शासन, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) आणि न्यायालयाच्या दारात पोहोचण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# समाजसेवक सुनील वाघ यांना 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर** : सामाजिक क्षेत्रात निस्पृह, निस्वार्थी आणि महत्त्वपूर्ण योगदान देणारे शिवणा (ता. सिल्लोड) येथील रहिवासी श्री. सुनील वाघ यांना 'वन व्हिजन फॅमिली' संस्थेच्या वतीने 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात पार पडला. समाजातील गरजू आणि उपेक्षितांच्या आरोग्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा बहुमान त्यांना प्रदान करण्यात आला.




सुनील वाघ यांचा जीवनप्रवास संघर्षातून यशाकडे नेणारा प्रेरणादायी आहे. अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेल्या आणि अवघ्या १० वर्षांचे असताना आईचे छत्र गमावलेल्या सुनील वाघ यांनी प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानता जिद्दीने स्वतःचा मार्ग तयार केला. रोजंदारी, मजुरी आणि शेतमजुरी करून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर १० ते १५ वर्षे कृषी सेवा केंद्रावर काम करत त्यांनी अनुभवाची शिदोरी मिळवली.

स्वतःच्या संघर्षाची जाणीव ठेवून त्यांनी उपेक्षितांच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या या सामाजिक प्रवासात त्यांना भाजपा नेते व सिल्लोड बाजार समितीचे माजी उपसभापती श्री. अरुण पाटील काळे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे . शिवणा हे मुख्य केंद्र मानून त्यांनी आरोग्याच्या क्षेत्रात मोठे कार्य उभे केले आहे. 'समता फाउंडेशन' आणि 'लॉयन्स नेत्र रुग्णालय'छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून त्यांनी शिवणा व सिल्लोड परिसरात आयोजित केलेल्या नेत्र तपासणी शिबिरांसह विविध उपक्रमांतून गेल्या काही वर्षांत २,००० हून अधिक लोकांची मोफत नेत्र तपासणी केली आहे. तसेच ६०० हून अधिक गरजू रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मोफत चष्मे, रुग्णांची ने-आण, रुग्णालयातील निवास आणि भोजनाची सुविधा त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन उपलब्ध करून दिली आहे.

रुग्णांना रुग्णालयात आधार देण्यापासून ते त्यांच्या उपचारांपर्यंतची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली आहे.

सुनील वाघ यांच्या या निस्वार्थी आणि समाजभिमुख कार्याचा गौरव म्हणून 'वन व्हिजन फॅमिली' संस्थेच्या वतीने त्यांना 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे. वाघ यांच्या या कार्याचे सिल्लोड व शिवणा परिसरातून सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# छोटा ताजबाग परिसरातील दुहेरी हत्याकांड उघडकीस; गुन्हे शाखेची जलद कारवाई

### तीन मुख्य आरोपी ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : सक्करदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील छोटा ताजबाग परिसरात घडलेल्या दुहेरी हत्याकांड प्रकरणी गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक 5 ने तत्पर कारवाई करत तीन मुख्य आरोपींना अवघ्या काही तासांत ताब्यात घेतले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदित्य उर्फ सोनू बोडवे आणि दादू उर्फ आदित्य राहुलकर या दोघांचा 10 जून 2026 रोजी रात्री सुमारे 8.30 वाजताच्या सुमारास छोटा ताजबाग, गोंड वस्ती जवळील रघुजी नगर परिसरात निर्घृण खून करण्यात आला.

या प्रकरणात पोलिसांनी वैभव उर्फ दादू प्रदीप राव डोंगरे (30), वेदांत उर्फ डब्बा अजय डबीर (20) आणि अभिषेक उर्फ तात्या उत्तम राऊत (26) या तीन आरोपींना



ताब्यात घेतले आहे.प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, एका फळ विक्रीच्या दुकानातून कामावरून काढून टाकल्याच्या कारणावरून मृतक आणि आरोपी यांच्यात पूर्वीपासून वाद सुरू होता. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. संतापाच्या भरात आरोपींनी विटा, दगड तसेच धारदार चाकूने दोन्ही युवकांवर हल्ला केला. गंभीर जखमी झालेल्या दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.घटना घडल्यानंतर आरोपी पळून जाण्याच्या तयारीत होते. मात्र गुन्हे शाखेचे युनिट क्रमांक 5, सक्करदरा पोलीस आणि तांत्रिक तपास पथकाने वेगाने सूत्रे हलवत आरोपींचा शोध सुरू केला. तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपींना विहिरगाव परिसरातील गारगोटी नाला येथून ताब्यात घेण्यात आले.ताब्यात घेतल्यानंतर आरोपींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांना सक्करदरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सक्करदरा पोलीस करीत आहेत.या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे गंभीर गुन्ह्याचा अल्पावधीत छडा लावण्यात नागपूर शहर गुन्हे शाखेला यश आले आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रमांक 5 च्या पथकाने केली.

# नेत्रदानातून अमरत्व प्राप्त केलेल्या विदर्भ वीरांगना रंजनाताई मामर्डे यांना कृतज्ञ अभिवादन

### हरीना फाउंडेशनतर्फे कुटुंबीयांचा गौरव; अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या उपस्थितीत भावपूर्ण कृतज्ञता समारंभ

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : नेत्रदान, अवयवदान आणि देहदान या समाजोपयोगी चळवळींना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत असलेल्या हरीना फाउंडेशन यांच्या वतीने अमरावती येथील राजकमल चौकात आयोजित भव्य कृतज्ञता समारंभात विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष तथा विदर्भ वीरांगना स्मृतीशेष श्रीमती रंजनाताई मामर्डे यांच्या नेत्रदानाबद्दल त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास प्रसिद्ध अभिनेते व वऱ्हाड भूषण भारत गणेशपुरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

समाजसेवा, जनजागृती आणि विदर्भ राज्याच्या चळवळीत सक्रिय योगदान देणाऱ्या रंजनाताई मामर्डे यांनी मृत्यूनंतरही नेत्रदानाच्या माध्यमातून मानवसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याची दखल घेत हरीना फाउंडेशनने त्यांच्या कुटुंबीयांचा विशेष सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी रंजनाताई यांच्या कन्या दीपाली उर्फ श्रीवल्ली, जावई कार्तिकेय, विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्रा. डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत तसेच कोअर कमिटी सदस्य डॉ. पद्माताई राजपूत यांना नेत्रदान स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी रंजनाताईंच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या नेत्रदानाच्या निर्णयाला समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. कार्यक्रमात नेत्रदान, अवयवदान आणि देहदान या विषयांवर जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. मान्यवर वक्त्यांनी अशा दानामुळे अनेक गरजू व्यक्तींना नवजीवन मिळू शकते, त्यामुळे समाजाने या चळवळीशी जोडले जावे, असे




आवाहन केले.या प्रसंगी अमरावती शहरातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच नेत्रदाते व त्यांच्या कुटुंबीयांसह विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पदाधिकारी, हरीना फाउंडेशनचे आयोजक, संयोजक आणि शेकडो नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रंजनाताई मामर्डे यांच्या स्मृतींना अभिवादन करत उपस्थितांनी नेत्रदानाचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या कार्यातून आणि नेत्रदानाच्या निर्णयातून समाजाला मानवतेचा आणि परोपकाराचा अमूल्य संदेश मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# सर्वोच्च न्यायालयाचा आदेश झुगारून अनुसूचित जमाती संवर्गातून बेकायदेशीर 'नीट' वैद्यकीय प्रवेश

## प्रवेश रद्द करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची ऑफ्रोट ची मागणी

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : देशभरात नीट च्या परीक्षेवरून गोंधळ उडालेला असताना पुन्हा एकदा नीट -2020, 2021,2022 च्या परीक्षेत गुणवत्ता यादीत अनुक्रमे अनुसूचित जमातीच्या राखीव संवर्गातून गैर आदिवासी संवर्गातील उमेदवारांना चुकीच्या पद्धतीने प्रवेश दिल्याची बाब पुढे आली आहे. ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल (ओफ्रोट) संघटनेच्या च्या वतीने ही तक्रार डायरेक्टर जनरल नॅशनल टेस्टिंग एजन्सी, दिल्ली यांचे सह महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस, राज्य सामायिक परीक्षा कक्ष, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे पुरावानिशी करण्यात आली आहे.

विदर्भात ' गोवारी' जातीला अनुसूचित जमातीचे लाभ मिळावेत अशी मागणी मागील चार दशकापासून आंदोलनाच्या माध्यमातून लावून धरण्यात आली आहे. 14 ऑगस्ट 2018 रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गोवारी जातीला गोंड गोवारी अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र देणे बाबतचा निर्णय देण्यात आला होता. या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात गोवारींना गोंड गोवारीचे जात प्रमाणपत्र राज्यातील महसुली अधिकाऱ्यांनी, म्हणजेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी निर्गमित केले. त्यानंतर या प्रमाणपत्राला राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अखत्यारीतील जात प्रमाणपत्र तपासणी समितीच्या माध्यमातून गोंड गोवारी जातीचे जात वैधता प्रमाणपत्र मोठ्या प्रमाणात देण्यात आले. या प्रमाणपत्राचा शैक्षणिक व शासकीय, निमशासकीय आणि खाजगी अनुदानित प्राधिकरणातील नोकरीतील सवलती प्राप्त करून घेण्यासाठी वापर करण्यात आला. नंतर राज्य शासनाने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केल्यावर त्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने 18 डिसेंबर 2020 रोजी दिला. या निर्णयात गोवारी जातीला अनुसूचित जमातीतील गोंड गोवारी जातीचे लाभ देता येणार नाही, असा स्पष्ट निकाल दिला. आणि या निकालात सर्वोच्च न्यायालयाने 14 ऑगस्ट 2018 ते 18 ऑगस्ट 2020 यादरम्यान च्या काळात जर गोवारीनी अनुसूचित जमातीतील गोंड गोवारी जात प्रमाणपत्राच्या तसेच जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतले असतील, शासकीय नोकरीत आरक्षण घेतले असेल किंवा नियुक्तीनंतर पदोन्नती घेतली असेल तर ती संरक्षित करण्यात येईल, असा निर्णय दिला. या निर्णयानंतर नीट परीक्षेच्या माध्यमातून अनुसूचित जमातीच्या राखीव संवर्गातून वैद्यकीय प्रवेश घेतलेल्या आरती नेवारे, प्राची कालसर्पे , गोपीचंद चौधरी, तेजस्विनी चौधरी, कपिल नेवारे, मानसी जितेंद्र बोपचे, ऋतुजा शेंद्रे, समृद्धी नेवारे, स्नेहल नेवारे , आरती शेंद्रे, आदित्य नेवारे, स्वाती सोनवणे अशी 12 उमेदवारांची यादी ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल संघटनेने प्रसिद्धी माध्यमांना दिली असून आदित्य नेवारे व स्वाती सोनवणे यांना उच्च न्यायालयाने स्वतः प्रवेश 21 डिसेंबर 2020 च्या आदेशान्वये नाकारलेला आहे. त्याची कसून चौकशी करावी, आणि हे प्रवेश रद्द करावे, त्याचप्रमाणे या प्रमाणपत्राच्या आधारे ज्यांनी त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, अशा उमेदवारांची नोंदणी महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स यांनी तात्काळ स्थगित करावी, अशा प्रवेशित उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, त्यांनी शासनाने दिलेले आर्थिक लाभ शासनाच्या तिजोरीत जमा करण्याची कारवाई व्हावी, या प्रवेश प्रक्रियेतील झालेल्या घोड्यची उच्चस्तरीय चौकशीप शासन स्तरावर भावी याचे तात्काळ आदेश द्यावे, पडताळणी कायद्यातील तरतुदीची स्वतः राज्य शासनाने अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करावेत, व नीट 2026 च्या परीक्षेत असे प्रवेश होणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी संघटनेचे कार्याध्यक्ष गंगाराम साखरकर यांनी केली आहे.

# कोकण रेल्वे भरती महाराष्ट्रातच घ्या; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**पनवेल प्रतिनिधी: दिपक कोळवणकर :** कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (KRCL) मधील विविध तांत्रिक पदांसाठी होणारी भरती प्रक्रिया महाराष्ट्रातच राबविण्यात यावी, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश बाळचंद्र ठाकूर यांनी केली असून, मागणीची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

यासंदर्भात ठाकूर यांनी KRCL चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (CMD) संतोष कुमार झा यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कोकण रेल्वे कॉर्पोरेशनकडून विविध तांत्रिक पदांसाठी वॉक-इन मुलाखतींद्वारे भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मात्र या मुलाखती महाराष्ट्राबाहेरील ठिकाणी आयोजित केल्या जात असल्याने महाराष्ट्रातील, विशेषतः कोकणातील पात्र व बेरोजगार युवकांवर अन्याय होत आहे.

मनसेने निदर्शनास आणून दिले आहे की, कोकण रेल्वेचा सर्वाधिक मार्ग महाराष्ट्रातून जातो तसेच संस्थेचे मुख्यालयही नवी मुंबई येथे आहे. असे असताना भरती प्रक्रियेसाठी महाराष्ट्रातील उमेदवारांना इतर राज्यांत जावे लागत असल्याने त्यांच्यावर आर्थिक व मानसिक भार पडत आहे. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी महाराष्ट्रातील ठिकाणी वॉक-इन मुलाखती आयोजित करण्यात याव्यात, अशी मागणी



करण्यात आली आहे.

तसेच भरती प्रक्रियेत महाराष्ट्रातील स्थानिक व पात्र उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे आणि त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

"कोकण रेल्वे ही महाराष्ट्राच्या अस्मितेशी जोडलेली संस्था आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील युवकांवर अन्याय होऊ देणार नाही. स्थानिकांना न्याय मिळाला नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल," असा इशारा संदेश ठाकूर यांनी दिला आहे.

मनसेने आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, गरज पडल्यास तीव्र आंदोलन, मोर्चे तसेच लोकशाही मार्गाने संघर्ष उभारला जाईल. त्यामुळे आता कोकण रेल्वे प्रशासन या मागणीवर कोणती भूमिका घेते, याकडे राज्यातील हजारो बेरोजगार युवकांचे लक्ष लागले आहे.स्थानिकांच्या हक्कांसाठी मनसे आक्रमक; कोकण रेल्वे भरतीचा मुद्दा तापण्याची चिन्हे

# येवदा ग्रामपंचायतीच्या 2026 निवडणुकीचे आरक्षण निश्चित; साई सचिन सोनवणे याच्या हातून पार पडली सोडत

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी**

**दर्यापूर :** उच्च न्यायालयाच्या 2006 च्या निकालानुसार होणाऱ्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या पार्श्वभूमीवर दर्यापूर तालुक्यातील येवदा ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत प्रक्रिया शासकीय नियमावलीनुसार पूर्ण करण्यात आली. या ऐतिहासिक सोडतीसाठी गावातील रहिवासी साई सचिन सोनवणे, वय 5 वर्षे, याची सर्व उपस्थित नागरिक व प्रतिनिधींच्या संमतीने निवड करण्यात आली.

**अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली प्रक्रिया**

ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास महसूल मंडळ अधिकारी अरविंद पवार, ग्राम महसूल अधिकारी योगेश नागरे, ग्राम महसूल अधिकारी लीना मोहोळ मॅडम, ग्रामपंचायत सचिव सागर निर्मळ यांच्यासह सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रथम निवडणूक अधिकाऱ्यांनी आरक्षण निश्चित करण्याच्या नियमांची



सविस्तर माहिती दिली. त्यानंतर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गातील राखीव जागा व महिला राखीव जागा कोणत्या प्रभागात येतील हे ठरवण्यासाठी चिठ्ठ्या काढण्यात आल्या.

सोडतीसाठी उपलब्ध असलेल्या प्रभाग क्रमांक 1, 2, 3, 4 मधून लहान मुलाच्या हाताने चिठ्ठ्या काढण्यात आल्या. यासाठी साई सचिन सोनवणे याची निवड करण्यात आली. त्याने पारदर्शकपणे चिठ्ठ्या काढून आरक्षण निश्चित केले. संपूर्ण प्रक्रियेदरम्यान कोणत्याही नागरिकाने आक्षेप नोंदवला नाही. सर्वांना प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील देण्यात आल्यानंतर सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले. ही प्रक्रिया दिनांक 06/2026 रोजी पार पडली.

परिशिष्ट 4, परिच्छेद 3.4 नुसार 15.06.2026 रोजी जाहीर झालेल्या पत्रकानुसार येवदा ग्रामपंचायतीच्या 6 प्रभागांसाठी आरक्षण निश्चित झाले आहे:

- *प्रभाग 1 - 3 सदस्य* : अनुसूचित जाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, सर्वसाधारण महिला
- *प्रभाग 2 - 2 सदस्य* : अनुसूचित जाती, सर्वसाधारण
- *प्रभाग 3 - 3 सदस्य* : नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण
- *प्रभाग 4 - 4 सदस्य* : अनुसूचित जाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सर्वसाधारण, सर्वसाधारण महिला
- *प्रभाग 5 - 3 सदस्य* : सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण
- *प्रभाग 6 - 3 सदस्य* : अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जाती महिला, सर्वसाधारण

2026 च्या आरक्षणात महिलांसाठी मोठे प्रतिनिधित्व मिळाले आहे. एकूण 18 पैकी 10 जागा थेट महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.

प्रभाग 3, 4 आणि 5 मध्ये प्रत्येकी 2 तर प्रभाग 1 व 6 मध्ये प्रत्येकी 1 जागा महिला राखीव आहे. यामुळे येवदा ग्रामपंचायतीच्या कारभारात महिलांचा सहभाग लक्षणीय वाढणार आहे.

सोडत प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने झाल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

आता आरक्षणानुसार इच्छुक उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

# दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिरात रंगणार कोकणातील प्रतिभावंत शाहिरांचा शक्ती तुऱ्याचा जंगी सामना

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,(केतन भोज) :** कोकणातील पारंपरिक लोककला होळी आणि गणेशोत्सव हे कोकणातील खरे खुरे उत्सव.या दोन्ही उत्सवासाठी येथील शेतकरी मोकळा असतो.भाताची लावणी संपली की घरोघरी गणपती येतात आणि भाताची कापणी / मळणी संपताच शिमग्याचे म्हणजेच होळीचे वेध लागतात.कोकणातील या दोन्ही सणांशी येथील लोककला निगडित आहेत.शक्ती-तुरा (जाखडी) हा सामूहिक नृत्याचा प्रकार आहे.गणेशोत्सवात गावातील प्रत्येक वाडीत जाखडीचा संच असतो.आठ गडी फेर धरून वादकांच्या भोवती नाचतात.ढोलकी आणि घुंगरू ही पारंपरिक वाद्ये आणि आधुनिक डांगाची गाणी यांचा मेळ जाखडीत असतो.जाखडीत आता अनेक बदल झालेत.वेशभूषा,प्रकाश योजना,संगीत आणि वाद्यवृंद यांनी सध्याची जाखडी वेगवान आणि रंगीतसंगीत बनली आहे.




**नवतरुण ग्रामस्थ मंडळ(कोचरी - भोजवाडी तर्फे आयोजन**

आता जाखडीचा जंगी सामना जणू प्रेक्षकांसाठी पर्वणी असते.कोकणातील लोककला हिच जतन करण्यासाठी आणि रसिक मनोरंजनासाठी राजापूर - लांजा असा दिग्गज शाहिरांचा जंगी मुकाबला रंगणार आहे.यामध्ये शक्तीवाले शाहीर लक्ष्मण सावंत,गायक पवन सावंत,सह.सत्यवान सुया राघव-भानुदास घराण्यातील,गुरुवर्य सखाराम रावणंग वस्ताद प्रभाकर धकटु यांचे शिष्य (शाखा:केदारलिंग गांगेश्वर नाच मंडळ,गोटणे - दोनिवडे,राघववाडी,ता. राजापूरयांच्याविरुद्ध तुरेवाले शाहीर कवी विजय भोज सह.मनोहर भोज - मूलगादी बाबू रंगले घराणे,शीघ्र कवी गुरु वासुवाणी यांचे शिष्य,गुरु शंकर तुकाराम वस्ताद मधुकर पंदरे,तुषार पंदरे, दत्ताराम भोज यांचे शिष्य(शाखा : गांगेश्वर नाच मंडळ,कोचरी - भोजवाडी,ता.लांजा,जि. रत्नागिरी हे शाहीर शक्ती-तुरा रसिकांचे मनोरंजन करणार आहेत.रसिक हो आपली उपस्थिती अनमोल असून हा सामना रविवार दि.१९ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वा. छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर दादर(पश्चिम) मुंबई येथे होणार आहे.या सामन्याचे आयोजन नवतरुण ग्रामस्थ मंडळ(कोचरी - भोजवाडी) कोचरी गांगेश्वर नाच मंडळ(लांजा, रत्नागिरी)यांनी सुखकर्ता गणेश मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी निधी संकलनार्थ केले असून अधिक माहितीसाठी किंवा तिकिट बुकिंगसाठी सुनिल भातडे-९८६७७१३९४७,महेश मांडवकर-९६६२२४१९६६, सुनिल भोज - ९८१९२१७९७७, वसंत भातडे - ९७६८९२६२२७ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शासनाने मका व धान खरेदी केंद्राद्वारे करवी यासाठी तहसीलदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी**

: लाखनी तालुक्यात मोठ्या प्रमाणात शासनाच्या विशेष धोरणाप्रमाणे मका व धान शेती करण्यात आली परंतु या उन्हाळी मक्याला व धानाला खरेदी करणारे केंद्र ठप्प झाल्याने मक्याचे केंद्र सुरू न झाल्याने चक्क तहसील कार्यालयाच्या गेटवरच मका आणून ठेवणार असे लेखी निवेदन माजी भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.श्याम झिंगरे यांनी तहसीलदारांना दिले आहे. लाखनी तालुक्यात यंदा मोठ्या प्रमाणात मक्याचे पीक घेण्यात आले परंतु मका खरेदीचे केंद्र मात्र शासनातर्फे सुरू करण्यात आले नाही त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी मिळेल त्या भावात खाजगी व्यापाऱ्यांना पडलेल्या किमतीत मका विकला. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले परंतु शासनाने मात्र अद्यापही मका खरेदीचे केंद्र लाखनी तालुक्यात सुरू केले नाही त्यामुळे शेतकऱ्यांवर अस्मानी संकट निर्माण झाले आहे. महाराष्ट्राचे शासन हे शेतकऱ्याची कैवारी असे म्हणणे सोपे असले तरी शेतकऱ्याच्या मालाला खरेदी करण्यापासून ते दूर जात असल्याची खंत ही यावेळी डॉ. झिंगरे यांनी बोलून दाखवीली. तालुक्यात मोठ्या प्रमाणात उन्हाळी धानाचे पीकही घेण्यात आले असून खरेदी विक्री लाखनी येथील धान खरेदी केंद्र ही ठप्प झाले आहे. यासंबंधी विचारणा केली असता खरेदी विक्रीचे अध्यक्ष महादेव गायधनी यांनी दुःख व्यक्त करताना सांगितले की आम्हाला जी लिमिट होती त्या लिमिटमध्ये धानाची खरेदी करण्यात आली आहे. लिमिट संपल्यामुळे धान खरेदी केंद्र बंद करून ठेवले आहे. महाराष्ट्र शासनाने धान खरेदी केंद्राची लिमिट वाढवून दिल्यास शेतकऱ्यांचे धान खरेदी करता येईल असेही म्हटले आहे. यंदा तालुक्यात मोठ्या प्रमाणात मक्याची लागवड करण्यात आली असून दिनांक 11/ 6/ 2026 पर्यंत जर मका खरेदी केंद्र, लाखनी तालुक्यात सुरू न केल्यास दिनांक 12 जूनला शेतातील मका पीक ट्रॅक्टरने उचलून तहसील कार्यालयाच्या गेटवर शेतकरी आणून ठेवतील असा इशाराही या लेखी निवेदनात माजी भाजपाध्यक्ष डॉ. श्याम झिंगरे यांनी तहसीलदारांना दिला आहे. या संदर्भात माहिती घेतली असता पिंपळगावला दोन गोडाऊन उपलब्ध असताना जाणीवपूर्वक मका व धान खरेदी करिता हे गोडाऊन घेण्यात आले नाही अशी चर्चा आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या या दुप्पटिपदाच्या धोरणामुळे शेतकरी मात्र भयानक संकटात सापडला असून तात्काळ मका खरेदी केंद्र व धान खरेदी केंद्र सुरू न केल्यास शेतकऱ्याला जगणे कठीण होणार आहे. तात्काळ मका खरेदी केंद्र सुरू करावे अन्यथा परिस्थिती चिघळल्यास या सर्वस्वी तहसीलदार जबाबदार राहील असेही निवेदनात नमूद केले आहे

# जनगणनेतील ओबीसी रकान्यासाठी संघर्ष तीव्र; प्रशासनाच्या दडपशाहीविरोधात जिल्हाभर आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** जनगणनेत अनुसूचित जाती (एससी) व अनुसूचित जमाती (एसटी) प्रमाणे इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजासाठी स्वतंत्र रकाना देण्यात यावा, या मागणीसाठी सुरू असलेला संघर्ष आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. ओबीसी समाजाच्या असहकार आंदोलनाला उत्तर म्हणून प्रशासनाकडून दबावतंत्राचा वापर केला जात असल्याचा आरोप करत, ओबीसी सेवा संघाचे तालुकाध्यक्ष उमेश सिंगनजुडे यांना बजावण्यात आलेल्या नोटिशीचा लाखनी येथे सरपंच संघटना व विविध ओबीसी संघटनांनी तीव्र निषेध नोंदविला.

मंगळवार, १० जून रोजी आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की, "जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकान्याची लेखी हमी देण्यात आली नाही आणि समाजाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरूच राहिला, तर संपूर्ण भंडारा जिल्ह्यात व्यापक जनआंदोलन उभारले जाईल."

**दुसऱ्या टप्प्यासाठी लेखी हमीची मागणी**

देशातील जनगणनेचा दुसरा टप्पा १ ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड येथे सुरू होणार असून महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये तो फेब्रुवारी २०२७ पासून राबविण्यात येणार आहे. या दुसऱ्या टप्प्यात ओबीसींचा स्वतंत्र रकाना राहील, याबाबत शासनाने लेखी स्वरूपात स्पष्ट आश्वासन द्यावे, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. पदाधिकाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला की, पहिल्या टप्प्यात एससी, एसटी आणि



'इतर' अशी माहिती घेतली जात असताना, त्याच प्राथमिक माहितीच्या आधारे दुसऱ्या टप्प्यात ओबीसींची स्वतंत्र नोंद नेमकी कशी केली जाणार? त्यामुळे शासनाने तातडीने दुसऱ्या टप्प्याची प्रश्नावली आणि संबंधित राजपत्र जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली.

**नोटिशीचा निषेध; आंदोलनाचा इशारा**

उमेश सिंगनजुडे यांना बजावण्यात आलेली नोटीस ही लोकशाही हक्कांवर गदा आणणारी असल्याचा आरोप करत उपस्थितांनी तिचा तीव्र शब्दांत निषेध केला. प्रशासनाने दडपशाहीचा मार्ग अवलंबल्यास आंदोलन आणखी व्यापक व तीव्र करण्यात येईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

परसराम फेंडरकर (तालुकाध्यक्ष, सरपंच संघटना, लाखनी) म्हणाले,"जनगणनेत आमची स्वतंत्र नोंदच होणार नसेल, तर आम्ही माहिती का द्यायची? शासनाने आमच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सरपंच संघटना आणि ओबीसी समाज रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन उभारेल."

संजय मते (जिल्हाध्यक्ष, ओबीसी क्रांती मोर्चा) यांनी सांगितले,"ओबीसींची स्वतंत्र जनगणना ही आमची हक्काची मागणी आहे. प्रशासनाने दडपशाही थांबवून दुसऱ्या टप्प्यात स्वतंत्र ओबीसी रकाना देण्याचे लेखी आश्वासन द्यावे, अन्यथा असहकार आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल."पत्रकार परिषदेला सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष परसराम फेंडरकर, ओबीसी क्रांती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय मते, खरेदी-विक्री सहकारी संस्थेचे अध्यक्ष महादेव गायधने, संत तुकाराम बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयकृष्ण फेंडरकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमराव आठोळे, नगरसेवक प्रदीप तितीरमारे, माधवराव भोयर, रामदास सार्वे, राजू निर्वाण, रमेश रोटके, माणिक शेंडे आणि जिल्हा समन्वयक उमेश सिंगनजुडे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी गंगाधर लुटे, संजय खेडीकर, अशोक हजारे, रमेश मस्के, मधुकर मोहतुरे, विनोद कोमेजवार, समीर मस्के, भोजराम डहाके, श्रीकांत नागलवाडे, संतोष सिंगनजुडे, देवराम फटे, दौलत काळे आदींसह मोठ्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते.

# अजितदादांच्या विचारांना अभिवादन; राष्ट्रवादी काँग्रेसचा २७ वा वर्धापन दिन समर्पण

## संघर्ष आणि संकल्प भावनेतून साजरा

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्स्ना करवाडे संपादिका विदर्भ विभाग :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २७ वा वर्धापन दिन बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालयात सकाळी ९.३० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, पक्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहण व मानवंदना देऊन वर्धापन दिनाचा गौरव सोहळा संपन्न झाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून पक्षाच्या जडणघडणीत, संघटन विस्तारात आणि देशभर पक्षाची मजबूत ओळख निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देणारे दिवंगत लोकनेते अजितदादा पवार यांच्या कार्याला अभिवादन म्हणून यंदाचा २७ वा वर्धापन दिन त्यांना समर्पित करण्यात आला आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प या निमित्ताने पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकारी यांनी केले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री माननीय सुनेत्रावहिनी अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष नव्या उमेदीने आणि नव्या दिशेने वाटचाल करत असून, या वर्धापन दिनाच्या माध्यमातून शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या समतावादी आणि परिवर्तनवादी विचारांना उजाळा देण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी घालून दिलेल्या सुसंस्कृत, पुरोगामी आणि विकासाभिमुख राजकारणाच्या परंपरेचे जतन करण्याचा निर्धार व्यक्त केला समर्पण, संघर्ष आणि संकल्प या त्रिसूत्रीवर आधारित हा वर्धापन दिन केवळ उत्सव नसून पक्षाच्या विचारधारेप्रती निष्ठा व्यक्त करण्याचा आणि संघटन अधिक बळकट करण्याचा एक महत्त्वपूर्ण सोहळा ठरणार आहे. या कार्यक्रमात पक्षाच्या विविध सेलचे प्रमुख, आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि सहकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले

# रक्तवीर जयेंद्र देशपांडे यांचा सामाजिक कार्यासाठी गौरव

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा :** सामाजिक बांधिलकी जपत निस्वार्थ सेवाभावाने समाजकार्य करणारे जयेंद्र देशपांडे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल नुकतेच सन्मानित करण्यात आले. रक्तदान, रुग्णसेवा, जनजागृती आणि गरजूंना मदतीचा हात देत त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

प्रहार संघटना, भंडारा जिल्ह्याचे उपाध्यक्ष, रक्तवीर व रुग्णमित्र म्हणून कार्यरत असलेले जयेंद्र देशपांडे यांनी आतापर्यंत ३२ वेळा स्वतः रक्तदान करून अनेकांचे प्राण वाचविण्यास हातभार लावला आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना "रक्तवीर" म्हणून गौरविण्यात आले. तसेच हजारो रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देत



त्यांनी "रुग्णमित्र" ही ओळखही मिळविली आहे.

समाजप्रबोधनाच्या कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग असून, होतकरू व जागरूक युवक-युवती तसेच नवविवाहित जोडप्यांना भारतीय संविधान, महामानवांच्या विचारांची पुस्तके, छत्रपती शिवाजी महाराज आणि चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या प्रतिमा भेट देऊन सामाजिक व ऐतिहासिक जाणीवा जागृत करण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत.

याशिवाय वृक्षारोपण, रुग्णांना फळांचे वाटप, गरजूंना ब्लँकेटचे वितरण, निराधारांना कपडे व रेशन पुरविणे अशा विविध उपक्रमांद्वारे ते समाजसेवेचा वसा जोपासत आहेत. कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता समाजातील गरजू घटकांसाठी ते नित्यनेमाने कार्यरत असल्याने विविध स्तरांतून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

त्यांच्या या प्रेरणादायी कार्यामुळे युवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होत असून, समाजसेवेच्या क्षेत्रात नवी ऊर्जा मिळत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. जयेंद्र देशपांडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा आदर्श अनेकांनी घ्यावा, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

# आष्टी ग्रामपंचायत सदस्य आरक्षण सोडत संपन्न; चार प्रभागांतून ११ सदस्यांची होणार निवड

## ११ सदस्यीय ग्रामपंचायतीत महिलांना ६ जागा; ग्रामस्थांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने आरक्षण निश्चित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : हदगाव तालुक्यातील मौजे आष्टी येथील ग्रामपंचायतीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम मंगळवार, दि. 11 जून २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात पार पडला. आष्टी मंडळाचे मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी तसेच ग्रामपंचायत प्रशासनाच्या उपस्थितीत सकाळी साडेदहा वाजता आरक्षण सोडतीची प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी गावातील माजी सरपंच, माजी ग्रामपंचायत सदस्य, विविध समाजघटकांचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोडतीपूर्वी उपस्थित नागरिकांना ग्रामपंचायत निवडणुकीतील आरक्षणाची पद्धत, शासनाचे नियम तसेच प्रभागनिहाय सदस्यसंख्येबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर शासनाच्या निर्देशानुसार गावातील एका लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठी काढून आरक्षण सोडत प्रक्रिया पार पाडण्यात आली. उपस्थितांच्या साक्षीने संपूर्ण कार्यवाही पारदर्शक वातावरणात पूर्ण झाली.

आष्टी ग्रामपंचायतीची एकूण सदस्य संख्या ११ असून निवडणुकीसाठी चार प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. मागील निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मध्ये तीन, प्रभाग क्रमांक २ मध्ये तीन, प्रभाग क्रमांक ३ मध्ये दोन तर प्रभाग क्रमांक ४ मध्ये तीन सदस्य होते. यावेळी प्रभाग क्रमांक १ व २ मध्ये प्रत्येकी तीन सदस्य कायम ठेवण्यात आले असून प्रभाग क्रमांक ३ मध्ये सदस्यसंख्या वाढवून तीन करण्यात आली आहे. तर प्रभाग क्रमांक ४ मध्ये दोन सदस्यांची निवड होणार आहे. अशा प्रकारे चारही प्रभागांतून एकूण ११ सदस्य निवडून दिले जाणार आहेत.

ग्रामपंचायतीतील एकूण ११ जागांवर ५० टक्के महिला आरक्षण



लागू होत असल्याने आरक्षणाचा आकडा ५.५ जागांपर्यंत पोहोचतो. शासनाच्या नियमानुसार अपूर्णांक संख्या पुढील पूर्णांकात रूपांतरित करण्यात येत असल्यामुळे महिलांसाठी एकूण ६ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये अनुसूचित जाती महिला २, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला १ आणि सर्वसाधारण महिला ३ जागांचा समावेश आहे.

प्रवर्गनिहाय आरक्षणात अनुसूचित जातीसाठी ३ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी २ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. गावात अनुसूचित जमातीची लोकसंख्या नसल्याने त्या प्रवर्गासाठी कोणतीही जागा राखीव ठेवण्यात आलेली नाही. उर्वरित जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आहेत.

**प्रभागनिहाय आरक्षण**

प्रभाग क्रमांक १ (३ जागा)
१) अनुसूचित जाती महिला
२) सर्वसाधारण महिला
३) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक २ (३ जागा)**
१) अनुसूचित जाती महिला
२) नागरिकांचा मागास प्रवर्ग
३) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ३ (३ जागा)**
१) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला
२) सर्वसाधारण महिला
३) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक ४ (२ जागा)**
१) अनुसूचित जाती
२) सर्वसाधारण महिला

आरक्षण सोडतीच्या वेळी श्री. यशवंत ज्ञानोबा प्रधान, श्री. गजानन मारोतराव शिंदे, श्री. चांदराव सोनबा कांबळे, श्री. नारायण मसाजी खंदारे, पत्रकार श्री.गजानन विजय जिदेवार, श्री.साहेबराव अर्जुनराव शिंदे, श्री.सुनील हिरामण खंदारे, श्री विश्वदीप कांबळे श्री अरविंद कापसे श्री प्रल्हाद जाधव श्री.संजय मुरलीधर भायेकर , श्री. वसंता सेवा जाधव,श्री. संजीव किसनराव कांबळे यांच्यासह गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

आरक्षण सोडत जाहीर झाल्यामुळे ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रभागनिहाय व प्रवर्गनिहाय जागांचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पुढील प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पार पडणार आहे.

**महिलांना मिळाले ५० टक्क्यांपेक्षा अधिक प्रतिनिधित्व**

११ सदस्यीय ग्रामपंचायतीत ५० टक्के महिला आरक्षणाचा आकडा ५.५ जागांपर्यंत पोहोचत होता. शासनाच्या नियमांनुसार अपूर्णांक संख्या पुढील पूर्णांकात रूपांतरित करण्यात आल्याने महिलांसाठी ६ जागा राखीव निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनात महिलांचे प्रतिनिधित्व अधिक बळकट होणार आहे.

**आष्टी ग्रामपंचायत आरक्षण एका नजरेत**
**एकूण सदस्य संख्या – ११**
**एकूण प्रभाग – ४**
**महिलांसाठी राखीव जागा – ६**
**अनुसूचित जाती – ३**
**अनुसूचित जमाती – ०**
**नागरिकांचा मागास प्रवर्ग – २**
**सर्वसाधारण – ६**

---

# मेडका येथील ऋषिकेश लेंडेवाडचे एम.बी.बी.एस. परीक्षेत घवघवीत यश



**दैनिक युवक आधार**
**मुदखेड | प्रतिनिधी योगेश चौदंते** : मुदखेड तालुक्यातील मेडका येथील रहिवासी ऋषिकेश जगन्नाथ लेंडेवाड याने एम.बी.बी.एस. पदवी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून डॉक्टर बनण्याचा मान मिळवला आहे. त्याच्या या यशामुळे मेडका गावासह संपूर्ण मुदखेड तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

ऋषिकेशने रत्नागिरी जिल्ह्यातील सावरडे (ता. चिपळूण) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. अंतिम एम.बी.बी.एस. परीक्षेत त्याने तब्बल ११४६ गुण मिळवत उज्ज्वल यश प्राप्त केले.

ऋषिकेशचा शैक्षणिक प्रवास अत्यंत प्रेरणादायी राहिला आहे. त्याने दहावीचे शिक्षण सावित्रीबाई फुले हायस्कूल, बाबानगर (नांदेड) येथून उत्कृष्ट गुणांसह पूर्ण केले. बारावीच्या परीक्षेत ९४.२० टक्के गुण मिळवत त्याने शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. त्यानंतर नीट (NEET) परीक्षेत ५१५ गुण मिळवून पहिल्याच प्रयत्नात वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवला.

आपल्या यशाचे श्रेय ऋषिकेशने आई प्रयागबाई लेंडेवाड, वडील जगन्नाथ लेंडेवाड तसेच गुरुजनांना दिले आहे. आई-वडिलांचे पाठबळ आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाल्याची भावना त्याने व्यक्त केली.

ऋषिकेशच्या या यशाबद्दल परिसरातील अनेक सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्याच्या निवासस्थानी भेट देऊन शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देत त्याचा आणि त्याच्या माता-पित्यांचा सत्कार केला.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष बालाजी गोडसे, माजी नगरसेवक गोविंद गोपनपले, हामीद भाई भंगारवाले, शहर प्रमुख अविनाश झमकडे, साहेबराव राहेरकर, निळकंठ पडोळे आणि ईश्वर पिन्नलवार उपस्थित होते.

ग्रामीण भागातून वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी झेप घेत ऋषिकेश लेंडेवाड यांनी मेडका गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

---

## कुंभार समाजासाठी ऐतिहासिक शासन निर्णय

# वर्षाला 700 ब्रास माती आणि वाळू मोफत; पारंपरिक व्यवसायाला मोठा आधार

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे प्रतिनिधी** : राज्यातील कुंभार समाज, मूर्तिकार आणि विटा बनविणाऱ्या कारागिरांसाठी राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या समाजाच्या वर्षानुवर्षांच्या मागणीला मान देऊन आता प्रत्येक कुंभार कुटुंबाला वर्षाला ७० ब्रासपर्यंत माती आणि आवश्यक वाळू मोफत देण्यात येणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली.

मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात ही योजना लागू करण्यात आली आहे. महसूल विभागामार्फत राज्यातील कुंभार कुटुंबांची नोंदणी केली जाईल. नोंदणी झालेल्या प्रत्येक कुटुंबाला ओळखपत्र अर्थात आयकार्ड देण्यात येणार आहे. या आयकार्डच्या आधारे वर्षभर मातीचा पुरवठा केला जाईल.माती उपलब्धतेसाठी पाझर तलाव, जलसंधारण तलाव आणि इतर ठिकाणांतील उपयुक्त मातीचा साठा वापरण्यात येईल. याशिवाय माती उत्खनासाठी स्वतंत्र क्लस्टर निश्चित करण्याची तरतूदही शासन निर्णयात करण्यात आली आहे. त्यामुळे बेकायदेशीर उत्खन आणि त्यावर होणारी



**- लाभार्थी: कुंभार समाज, मूर्तिकार, विटा बनविणारे कारागीर**
**- लाभ: वर्षाला ७० ब्रासपर्यंत माती + आवश्यक वाळू मोफत**
**- प्रक्रिया: महसूल विभागाकडून कुटुंबांची नोंदणी आणि आयकार्ड वितरण**
**- मातीचा स्रोत: पाझर तलाव, जलसंधारण तलाव, निश्चित क्लस्टर**
**- उद्देश: पारंपरिक व्यवसाय टिकवणे, आर्थिक सक्षमिकरण**

कारवाई टळून कारागिरांना निर्धास्तपणे व्यवसाय करता येईल.

कुंभार समाजाची माती मिळण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबत आश्वासन दिले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला असून पारंपरिक व्यवसाय टिकवण्यासाठी कुंभार समाजाला मोठा दिलासा मिळणार आहे.

या निर्णयामुळे मूर्तिकार, मडकी बनविणारे कारागीर आणि कुंभार समाजातील हजारो कुटुंबांना थेट आर्थिक फायदा होणार आहे. महागड्या मातीमुळे आणि दंडात्मक कारवाईच्या भीतीमुळे अनेक कारागिरांनी व्यवसाय सोडला होता. आता मोफत माती आणि वाळू मिळाल्याने उत्पादन खर्च कमी होऊन पारंपरिक मातीच्या उद्योगाला चालना मिळेल. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, "राज्यातील पारंपरिक मातीच्या उद्योगाला चालना देण्यासाठी आणि कुंभार समाजाच्या आर्थिक सक्षमिकरणासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. राज्य सरकार पारंपरिक व्यवसायाच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे."

---

# गजानन भोयर पाटील यांच्या पुढाकारातून ‘बळीराजा मदत वाहिनी’ची सुरुवात; शेतकऱ्यांच्या प्रत्येक लढ्यात संभाजी ब्रिगेड खंबीरपणे सोबत!

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर प्रभावीपणे आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संभाजी ब्रिगेड, जिल्हा वाशिमच्या वतीने ‘बळीराजा मदत वाहिनी (Bali-raja Help Line)’ सुरू करण्यात आली आहे. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन भोयर पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या उपक्रमामुळे शेतकरी वर्गाला मोठा आधार मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.सध्या खरीप हंगामाच्या तोंडावर जिल्ह्यात खतांचा तुटवडा, जादा दराने खत विक्री, खतासोबत इतर औषधे घेण्याची सक्ती, बोगस खतांचा पुरवठा तसेच रेतीयुक्त खत विक्रीच्या तक्रारी वाढत आहेत. अनेक शेतकरी या समस्यांमुळे आर्थिक संकटात सापडले असून प्रशासनापर्यंत त्यांचा आवाज पोहोचत नसल्याची खंत व्यक्त करत आहेत. ही बाब लक्षात घेऊन संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन भोयर पाटील यांनी शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र मदत वाहिनी सुरू करण्याचा निर्णय घेतला.

याशिवाय शेतजमीन बळकावण्याचे प्रकार, जमिनीच्या मोजणीसाठी होणारा विलंब, सावकारांकडून होणारा त्रास, अधिकाऱ्यांकडून होणारी दिरंगाई



तसेच विविध कार्यालयांमध्ये प्रलंबित असलेली कामे यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडत आहेत. या सर्व प्रश्नांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन, पाठपुरावा आणि आवश्यक ती मदत मिळावी यासाठी बळीराजा मदत वाहिनी कार्यरत राहणार आहे.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन भोयर पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांवर अन्याय होत असेल तर संभाजी ब्रिगेड शांत बसणार नाही. कोणत्याही शेतकऱ्याला खत मिळत नसेल, जादा दराने खत विकले जात असेल, महसूल किंवा कृषी विभागाशी संबंधित अडचणी येत असतील अथवा कार्यालयांमध्ये कामे रखडली असतील तर त्यांनी तातडीने मदत वाहिनीशी संपर्क साधावा. प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला जाईल.बळीराजा मदत वाहिनीसाठी जिल्हाध्यक्ष गजानन भोयर पाटील (मो. ९०२८९४७०२७), वाशिम तालुकाध्यक्ष तानाजी काळांडे (मो. ८७६६५०१३६३), मालेगाव तालुकाध्यक्ष गोपाल भगवान कुचे (मो. ९६८९६९५२५५), मंगरुळपीर तालुकाध्यक्ष ॲड. अजय गवागरगुरु (मो. ९१५६४६६१२३), कारंजा तालुकाध्यक्ष संचिन खंडागळे (मो. ७०२०९१२९१४) तसेच मानोरा तालुकाध्यक्ष प्रकाश नानाभाऊ मिसाळ (मो. ७२६२०८४२९९) यांच्याशी थेट संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**"शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्यावर होणारा अन्याय आम्ही कदापि सहन करणार नाही. खतांचा तुटवडा, बोगस खत विक्री, जादा दराने खत विक्री, जमिनीचे वाद, सावकारांचा त्रास किंवा शासकीय कार्यालयातील दिरंगाई यांसारख्या कोणत्याही प्रश्नांसाठी शेतकऱ्यांनी तात्काळ बळीराजा मदत वाहिनीशी संपर्क साधावा. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरून संघर्ष करण्यासही मागे-पुढे पाहणार नाही."**
**– गजानन भोयर पाटील**
**जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, वाशिम**

गेल्या अनेक वर्षांपासून संभाजी ब्रिगेड शेतकरी, विद्यार्थी आणि सामाजिक प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेत आहे. आता ‘बळीराजा मदत वाहिनी’च्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचून त्याच्या समस्या सोडविण्यासाठी संघटना सज्ज झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी एक मजबूत व्यासपीठ उपलब्ध झाले असून या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# बालपणाला मुक्त श्वास देऊया



दि. १२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.

बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.

जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.

भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षांखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.बालमजुरीचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. वाढत्या वयात अति श्रम केल्यामुळे त्यांच्या शरीराची योग्य वाढ होत नाही. कुपोषण, अशक्तपणा, श्वसनविकार, त्वचारोग आणि दृष्टीदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांना रसायनांच्या संपर्कामुळे दीर्घकालीन आजार होऊ शकतात. अपुऱ्या विश्रांतीमुळे आणि अस्वच्छ वातावरणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते. बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे. बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते. शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते. बालमजुरीविरोधी जागतिक दिन आपल्याला केवळ समस्या दाखवून देत नाही, तर उपाययोजनांची दिशाही दाखवतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# 'हे' ६ गोड पदार्थ पचनक्रिया सुधारण्यास आणि पोट हलके ठेवण्यास मदत करू शकतात

तुम्हाला मिठाई आवडते आणि त्यात काहीही चुकीचे नाही. भारतामध्ये मिठाई हे आपल्या दैनंदिन जीवनाशी, सण-उत्सवांशी निगडित आहे. खूप जास्त खाल्ल्याने किंवा चुकीच्या प्रकारची मिठाई खाल्ल्याने पोट जड झाल्यास किंवा रक्तातील साखरेची पातळी पुन्हा पुन्हा वाढू लागल्याने ही समस्या उदभवते. अशा परिस्थितीत मिठाई खाण्याचा आनंद हळूहळू अपराधीपणा आणि त्रासात बदलतो.

चांगली गोष्ट म्हणजे पचनक्रिया व्यवस्थित ठेवण्यासाठी आणि रक्तातील साखर संतुलित ठेवण्यासाठी मिठाई पूर्णपणे सोडून देण्याची गरज नाही. फक्त योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे. अशी मिठाई पौष्टिक आणि बनवायला सोपी असते. त्या मिठाईमुळे पोटावर ताण पडत नाही आणि मिठाईची लालसाही भागवते.

**आतड्याचे आरोग्य आणि रक्तातील साखरेचा कसा संबंध आहे?**

तुमच्या आतड्याचे आरोग्य ठरवते की, शरीर अन्नावर कशी प्रतिक्रिया देईल. जेव्हा पचन मंद आणि संतुलित असते तेव्हा साखर हळूहळू रक्तप्रवाहात जाते. पण जेव्हा पोट कमजोर असते तेव्हा रक्तातील साखर झपाट्याने वाढते. म्हणूनच फायबर, आंबवलेले पदार्थ आणि आरोग्यदायी चरबी हे



खूप महत्वाचे आहेत. पोट-हेल्दी स्वीट स्नॅक्स पचन मंदावते, पोट दीर्घकाळ भरलेले राहते. त्याशिवाय त्यामुळे अचानक आणि वारंवार होणारी भूकदेखील कमी होते. त्यामुळे साखर नियंत्रित करणे सोपे होते.

**तीळ व गुळाचे लाडू**

तिळाचे लाडू हे फक्त हिवाळ्यातील गोड पदार्थ नसून पौष्टिक ऊर्जा वाढवणारे आहेत. तीळ पचनास मदत करतात आणि आरोग्यदायी चरबी देतात; तर गूळ नैसर्गिक गोडवा आणि खनिजे प्रदान करतात.

**नाचणीचे लाडू**

नाचणी हळूहळू पचते आणि शरीराला स्थिर ऊर्जा प्रदान करते. त्यामध्ये भरपूर फायबर असल्याने पोट हलके राहते.

**खजूर आणि नारळाचे लाडू**

खजूर नैसर्गिकरीत्या गोड असतात आणि ते आतड्यातील जीवाणूंना मदत करतात. नारळात आरोग्यदायी फॅट्स (चरबी) देखील असतात, जे साखरेचे शोषण कमी करतात.

**उकडीचे मोदक**

उकडीचे मोदकदेखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तुम्ही मोदकात साखरेऐवजी तुम्ही गुळाचा वापर करू शकता. हे मोदक तुपाबरोबर अतिशय स्वादिष्ट लागतात.

**श्रीखंड**

आतड्याच्या आरोग्यासाठी श्रीखंड दह्यामधील नैसर्गिक प्रो-बायोटिक्स पचनासाठी फायदेशीर असतात. घरी बनवलेले श्रीखंड योग्य प्रकारे तयार केल्यास पचनसंस्थेसाठी फायदेशीर ठरू शकते.

**पोहे आणि गुळाचे गोड मिश्रण**

पोहे हलके आणि पचायला सोपे असतात. गूळ आणि नारळासोबत एकत्र केल्यावर हा एक समाधानकारक गोड पदार्थ तयार होतो.

# घरात या ठिकाणी दिवा लावणे आहे लाभदायी

वास्तू शास्त्रात घरात दररोज न चुकता दिवा लावण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दिवा केवळ अंधार दूर करत नाही, तर घरात सकारात्मक ऊर्जा आणि समृद्धी घेऊन येतो. आपण देवापुढे किंवा तुळशीजवळ दिवा लावतोच, पण वास्तूशास्त्रानुसार घरात अशा अनेक जागा आहेत जिथे नियमित दिवा लावल्याने घरात सुख समृद्धी येते आणि माता लक्ष्मीची कृपा अखंड राहते. नक्की कोणत्या आहेत या जागा आणि तिथे दिवा लावण्याचे काय फायदे आहेत? जाणून घेऊया सविस्तरपणे

**मुख्य प्रवेशद्वार**

घराच्या मुख्य द्वारातून लक्ष्मी घरात प्रवेश करते. त्यामुळे रोज संध्याकाळी घराच्या मुख्य प्रवेशद्वारा बाहेर उजव्या बाजूला तेलाचा दिवा लावावा. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करत नाही.

**तुळशी वृंदावन**

तुळशीला माता लक्ष्मीचेच रूप मानले जाते. संध्याकाशळी तुळशीपाशी दिवा लावणे शुभ मानले जाते. यामुळे घरात सुख,



शांती आणि समृद्धी नांदते.

**घराचा ईशान्य कोपरा**

घराच्या ईशान्य कोपऱ्यात तुपाचा दिवा लावावा, कारण हा कोपरा उत्तरपूर्व दिशा देवांची दिशा मानली जाते. यामुळे भगवान विष्णू आणि लक्ष्मी देवी प्रसन्न होतात.

**स्वयंपाकघर**

देवी अन्नपूर्णेचे स्थान म्हणजे स्वयंपाकघर. येथील पाण्याच्या स्त्रोताजवळ छोटा दिवा दररोज अवश्य लावावा. यामुळे पितृदोष दूर होतो आणि पैशांची कमी पडत नाही.

**महत्त्वाच्या गोष्टी –**

पूजेसाठी कधीही खंडीत किंवा तुटलेला दिवा वापरू नये. दिवा कायम माती किंवा धातूचा असावा.दिवा किमान अर्धा तास तरी राहील याची काळजी घ्यावी.दिव्याची ज्योत पूर्व किंवा उत्तर दिशेकडे असावे.

# उन्हाळ्यात रिकाम्या पोटी मोसंबीचा रस प्यायल्याने काय होते?

मोसंबीचा रस आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानला जातो. लोक अनेकदा ताजा रस पिणे पसंत करतात. कारण त्यात 'व्हिटॅमिन सी' आणि विविध आवश्यक पोषक घटक असतात, जे केस आणि त्वचेसाठी चांगले असतात. मात्र, रिकाम्या पोटी याचे सेवन करणे योग्य आहे का आणि त्यासाठी कोणती खबरदारी घेतली पाहिजे? याबद्दल आपण या लेखात सविस्तर माहिती घेऊया.

मोसंबी रसाचे फायदे खालीलप्रमाणे :

शरीर सुदृढतेसाठी उपयुक्त

मोसंबीमध्ये 'क' जीवनसत्त्व ?भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे रोगप्रतिकार शक्ती मजबूत होण्यास मदत होते. त्याचे नियमित सेवन केल्याने शरीर बळकट होण्यास मदत होते.



शरीरात पाण्याचे योग्य प्रमाण टिकवण्यास साह्यभूत

मोसंबीमध्ये पाण्याचे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे सकाळी तिचे सेवन केल्याने शरीरात पाण्याचे योग्य प्रमाण राखण्यास मदत होते. त्यामुळे शरीरातील आर्द्रता टिकून राहते आणि उन्हाळ्यात डिहायड्रेशनचा (पाणी कमी होण्याचा) त्रास होत नाही. मात्र, मोसंबीचा रस काढल्यानंतर तो जास्त वेळ तसाच ठेवू नये.

पचनक्रियेसाठी फायदेशीर

काही लोकांना रिकाम्या पोटी मोसंबीचा रस प्यायल्याने पचनक्रिया चांगली राहण्यास आणि पोटाला हलके वाटण्यास मदत मिळू शकते. जर तुम्हाला पोटाच्या तक्रारींचा वारंवार त्रास होत असेल किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल, तर हा रस पिणे फायदेशीर ठरू शकते.

त्वचेसाठी फायदेशीर

क जीवनसत्त्व आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेचे आरोग्य जपण्यास आणि तिची नैसर्गिक चमक टिकवून ठेवण्यास मदत करू शकतात. तुम्ही याचा आहारात समावेश करू शकता किंवा 'फ्रूट चाट'च्या स्वरूपातही याचा आस्वाद घेऊ शकता.

थकवा दूर करण्यास मदत

मोसंबीच्या रसामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते, ज्यामुळे आळस आणि थकवा कमी होण्यास मदत होते. जर थकवा कायम राहिला, तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

याचे सेवन कोणी टाळावे?

जर तुम्हाला ॲसिडिटीचा त्रास होत असेल, तर याचे सेवन टाळावे. ज्यांना पोटातील अल्सरचा त्रास आहे, त्यांच्यासाठी यामुळे समस्या वाढू शकतात. रिकाम्या पोटी याचे सेवन केल्यास अस्वस्थता अधिक वाढू शकते.

मोसंबीचा रस पिण्याची योग्य पद्धत

हा रस पिण्यासाठी सकाळची वेळ सर्वांत उत्तम असते. घरीच ताजा रस काढून, त्यात अतिरिक्त साखर न घालता, तो पिणे सर्वांत चांगले असते. नाश्त्यासोबत योग्य प्रकारे सेवन केल्यास, तुम्ही यात चिमूटभर काळे मीठ घालूनही तो घेऊ शकता.